नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष १५ * अंक ३०६ * * गोंदिया * शनिवार, दिनांक ३ मे २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## रॉबर्ट वाड्रा यांच्या विरोधात याचिका दाखल

■ वृत्तसंस्था, कानपूर, दि. २ :
पहलगाम हल्ल्यानंतर, काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा म्हणाले होते की दहशतवाद्यांनी नागरिकांना ओळखले आणि त्यांना लक्ष्य केले कारण त्यांना वाटते की भारतात मुस्लिमांना दडपले जात आहे.

या विधानावर कानपूरचे राम नारायण सिंह यांनी रॉबर्ट वाड्रा यांच्याविरुद्ध खटला दाखल करण्यासाठी सीजेएम न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. वाड्रा यांचे हे विधान समाजात द्वेष पसरवणारे आहे, असा आरोप आहे. राम नारायण सिंह यांचे वकील संजय मिश्रा म्हणाले की, न्यायालयाने पोलिसांकडून अहवाल मागवला आहे. पोलिस अहवाल आल्यानंतर, एफआयआर नोंदवायचा की नाही याचा निर्णय घेतला जाईल.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# गडकरींची विजयगाथा

नितीन गडकरी त्यांच्या मनात जे आहे. ते बोलण्यासाठी प्रसिद्ध आहेत. आम्ही गेली ३० ते ४० वर्ष त्यांचे समाजकारण, राजकारण आणि लोक कल्याणकारण वेगवेगळ्या कोनतून पाहिले आहे. त्यांची कार्यशैली कधी डोळ्याने, कधी बुद्धीने, तर कधी ऐकून, कधी वाचून, कधी कधी तर पारखून पारखून बघत आलो आहोत. या माणसाच्या कल्पना गगनविहारी असतात. गडकरी यांना समजून घेणे. भल्याभल्यांना जमत नाही. नितीन गडकरी यांचे बोलणे, वागणे आणि काम करणे याबाबत त्यांची स्वतःची अशी एक ठराविक पद्धत आहे. थोडक्यात सांगायचे झाले. तर हा राजकारणी माणसांच्या घोळक्यात सुखावतो. यांना सर्वांच्या कामाची तळमळ असते. आपल्याला शक्य असेल तेवढी मदत अडला नडलेल्यांना करण्यास नितीन गडकरी सदैव तत्पर असतात. त्यांचा जनता दरबार केवळ जनता दरबार नसतो. तर तो? खराखुरा जाणता दरबार असतो. लोकांचे प्रश्न सोडवणे, त्यांच्या समस्यांना उत्तर देणे. लोकांना वेळोवेळी वेगवेगळ्या प्रकारे मार्गदर्शन करणे, हा नितीनजींचा जन्मजात छंद आहे. समोरचा माणूस कोणत्या पक्षाचा आहे. याचा जराही विचार न करता त्याला मदत करणे, हा दैव दुर्मिळ योग गडकरी यांच्याशी बोलल्यावर दिसून येतो. गडकरी यांना शेतीच्या प्रश्नाबद्दल आणि शेतकऱ्यांबद्दल अगदी अंतरात्म्यापासून जिव्हाळा आहे. आपला शेतकरी आर्थिक दृष्ट्या बलवान व्हावा. त्याच्या हाती चार पैसे खेळावेत. त्याला आत्महत्या करावी लागण्यासारखे मार्ग पत्करावे लागू नयेत किंवा अशी परिस्थितीच येऊ नये. यासाठी वेगवेगळ्या प्रकारे मदत करण्याचे त्यांचे जे काही मार्ग आहेत. ते नागपूरच्या जनतेला नेहमीच दिसतात. साहित्य, नाट्य, लोककला, कविता, क्रीडा आणि इतर कला क्षेत्रातील गुणीजनांचे कौतुक करण्यात गडकरी सदैव रमलेले असतात. अशा बाबतीत ते अग्रेसर असतात. या सर्व कार्य बाहुल्यामुळे गडकरी कोणत्याही कार्यक्रमात वेळेवर पोहोचू शकत नाहीत. असे नितीन गडकरी निवडून कसे काय येतात, हा अनेकांसमोर नेहमीच प्रश्न असतो. त्यामुळे त्यांच्या विरुद्ध न्यायालयात काही याचिका दाखल करण्यात आलेल्या होत्या. गडकरी यांनी आचारसंहिता भंग केली आणि त्यामुळे लोकसभा निवडणूक प्रभावित झाली. असा आरोप करून मोहम्मद नफीस नामक कोणत्यातरी मतदाराने आणि फोनवर कधीच उपलब्ध नसणारे, कोणे एकेकाळचे भारतीय जनता पक्षाचे खासदार नाना पटोले यांनी दाखल केलेला खटला खाटल्यावरच गडप झाला. काहीतरी खुसपटे काढून विनाकारण स्वतःचा आणि न्यायालयाचा त्यासोबत नितीन गडकरी यांचा वेळ दवडणारा खटला म्हणजेच ती याचिका विद्वान न्यायाधीशांनी कमकुवत आणि गुणवत्ताहीन ठरवलेली आहे. कारण नसताना विनाकारण स्वतःची हजामत करून घेण्यास यांना कोणी सांगितले होते. हे त्यांचे त्यांनाच ठाऊक. आपल्या देशात उठसूट किरकोळ बाबींसाठी खटले दाखल करणे. हा काही लोकांचा आवडता छंद आहे. खटले दाखल केले म्हणजे आपण काहीतरी फार मोठे काम करीत आहोत. असा आभास निर्माण करण्यात अनेक पराभूत उमेदवार धन्यता मानतात. नाना पटोले गेल्या विधानसभेच्या निवडणुकीत जवळजवळ पराभूत झालेच होते. पण जीवावर बेतलेली, शेपटावर निभावली. त्यामुळे शंभर, दोनशे मतांच्या फरकाने पटोले यांची आमदारकी कायम राहिली. त्यांच्या विरुद्ध विरोधी पक्षाच्या उमेदवाराने अशी तक्रार करून त्यांची निवडणूक रद्द ठरवली गेली. तर काय बहार येईल असे आम्हाला वाटते. एखाद्या पैलवानाला आपण कुस्तीत पराभूत करू शकत नाही. मग निदान आपल्या वात्ताड्नाचा प्रयोग करून आपल्याला सुख, शांती, समाधान मिळवून घेणारे अनेक पैलवान समाजात असतात. अशा रडीचा डाव खेळणाऱ्या पैलवानांना न्यायालयाने दिलेली ही चपराक आता तरी समजली पाहिजे. गडकरी यांचे नागपुरातून खासदार असणे. हा नागपूरच्या जनतेला मिळालेला दिलासा असतो. जात-पात पंथ, पक्ष याचा कोणत्याही प्रकारे विचार न करता खरा लोकाग्रणी नेता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे तावून, सुलाखून निघालेला आहे. याचा आम्हाला मनापासून आनंद आहे. एकूण काय, तर कोणीही कितीही खुसपटे काढून नितीनजींना त्रास देण्याचा प्रयत्न केला. तरी त्यातून ते बाहेर पडतात. हीच खरीखरी गडकरींची विजयगाथा आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# वेव्हज् परिषदेत आठ हजार कोटींचे सामंजस्य करार!

### एज्यू सिटी'त आंतराष्ट्रीय विद्यापीठे येण्याचा विश्वास • एए स्टुडिओसाठी गोदरेजसोबत करार

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
विकसित भारताच्या उभारणीसाठी आखण्यात आलेल्या नवीन शैक्षणिक धोरणामुळे भारताचे दरवाजे जगासाठी खुले झाले आहेत. नवी मुंबईत आकाराला येत असलेल्या एज्यू सिटी मध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची विद्यापीठे येतील आणि परदेशात शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वप्न आता येथेच पूर्ण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केला.

फडणवीस यांच्या उपस्थितीत आज वेव्हज २०२५ परिषदेमध्ये ८ हजार कोटी रुपयांचे विविध सामंजस्य करार करण्यात आले. यावेळी सिडकोमार्फत युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क आणि युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया यांच्याबरोबर प्रत्येकी १५०० कोटी रुपयांचा करार करण्यात आला. तसेच राज्याच्या उद्योग विभागामार्फत प्राईम फोकस कंपनी सोबत ३ हजार कोटी रुपयांचा तसेच गोदरेज सोबत दोन हजार कोटी रुपयांचा सामंजस्य करार करण्यात आला.



यावेळी बोलताना फडणवीस म्हणाले, जगातील दोन सर्वोत्तम विद्यापीठांसोबत सामंजस्य करार होत आहे. नवी मुंबईत सुरू होत असलेल्या एज्यू सिटीमध्ये जगभरातील सर्वोत्तम विद्यापीठे एकाच ठिकाणी येतील. त्यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विद्यापीठांत शिकण्याचे येथील युवकांचे स्वप्न प्रत्यक्षात येणार आहे.

जगभरात भारतीय चित्रपटसृष्टी आणि कला यांची मोठी लोकप्रियता आहे. आपल्याला सर्वोत्तम व्हायचे आहे. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करायचे आहे आणि आपल्या प्रतिभावान तंत्रज्ञांच्या कौशल्यातून नवनिर्मिती करायची आहे, असे सांगून फडणवीस म्हणाले, प्राईम फोकस आणि गोदरेज यांच्यासोबतच्या करारांमुळे आपले उद्दिष्ट पूर्ण होईल. विश्वास, गुणवत्ता आणि विश्वासार्हतेसाठी ओळखल्या जाणाऱ्या निवडक कंपन्यांमध्ये गोदरेजचे नाव अग्रगण्य आहे.

गोदरेजकडून उभारला जाणारा स्टुडिओ सर्वोत्तम ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. करार झालेल्या सर्व संस्थांना राज्य सरकारच्यावतीने आवश्यक ते सर्व सहकार्य केले जाईल, असे आश्वासनही फडणवीस यांनी यावेळी दिले.

## कर्जमाफीवरून घुमजाव



■ वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. २ :
महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर कर्जमाफी मिळेल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र, उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी कर्जमाफीचे आश्वासन कोणी दिले? असा उलटसवाल केला. अजित पवारांच्या या वक्तव्यावरून नवीन वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन कोणी दिले? मी दिले आहे का? मी तरी दिले नाही, असे म्हणत एक प्रकारे या मुद्द्याला बगल देण्याचा प्रयत्न केला.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारकाळात महायुतीच्या अनेक नेत्यांनी, सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली जाईल, असे आश्वासन दिले होती. मात्र, सत्तेवर घुमजाव केले जात आहे.


## 'डीसीएम टू सीएम' आंदोलन



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :
राज्य सरकारकडून शेतकरी कर्जमाफीबाबत कोणताही स्पष्ट निर्णय न झाल्यामुळे बच्चू कडू यांनी जूनपासून राज्यभर आंदोलन छेडण्याची घोषणा केली आहे.
डीसीएम टू सीएम अशा नावाने हे आंदोलन राबवले जाणार असून, त्याची सुरुवात २ जून रोजी बारामती येथून होणार आहे. टप्प्याटप्प्याने मंत्र्यांच्या घरासमोर आंदोलन करीत सर्वात शेवटी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नागपूर येथील निवासस्थानासमोर आंदोलन करणार असल्याची घोषणा बच्चू कडू यांनी केली आहे.

## पाकिस्तानी पीएम शरीफ यांचे यूट्यूब भारत सरकारकडून ब्लॉक

### ४ क्रिकेटपटूंचे इंस्टाग्राम अकाउंटही बंद



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २ :
भारताने पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचे अधिकृत यूट्यूब चॅनल आणि इंस्टाग्राम अकाउंट ब्लॉक केले आहे. भारताने पाकिस्तानी क्रिकेटपटू बाबर आझम, हरिस रौफ, मोहम्मद रिजवान आणि शाहीन आफ्रिदी यांचे इंस्टाग्राम अकाउंटही ब्लॉक केले आहेत.

यापूर्वी, पाकिस्तानचे माजी परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो म्हणाले होते की, पाकिस्तानला दहशतवादाचा इतिहास आहे, हे काही लपलेले नाही. गुरुवारी, स्काय न्यूजने बिलावल भुट्टो यांना पाकिस्तानी संरक्षण मंत्री ख्वाजा आसिफ यांनी केलेल्या विधानाबाबत प्रश्न विचारला होता. पहलगाम हल्ल्यानंतर ख्वाजा आसिफ म्हणाले होते की, पाकिस्तान गेल्या ३० वर्षांपासून दहशतवाद्यांना निधी देत आहे. बिलावल यांनी आसिफ यांच्या विधानाचे समर्थन केले आणि म्हटले की पाकिस्तानला त्यांच्या चुकांचे परिणाम भोगावे लागले.

## सोनिया, राहुल यांना नोटीस

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २ :
नॅशनल हेराल्ड प्रकरणात दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू कोर्टाने सोनिया आणि राहुल गांधींना नोटीस बजावली. या प्रकरणाची दुसरी सुनावणी न्यायालयात झाली.

या प्रकरणात न्यायालयाने सॅम पित्रोदा, सुमन दुबे, सुनील भंडारी, मेसर्स यंग इंडिया आणि मेसर्स डोटेक्स मर्चेंडाइज प्रायव्हेट लिमिटेड यांनाही नोटीस बजावली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ८ मे रोजी होईल. आरोपपत्रात काही कागदपत्रे गहाळ आहेत, असे कोर्टाने यापूर्वी म्हटले होते.

## ८,९०० कोटींच्या बहुउद्देशीय बंदराचे उद्घाटन

### केरळ सीएम व शशी थरूर मोदींसोबत मंचावर

■ वृत्तसंस्था
तिरुवनंतपुरम, दि. २ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी केरळमधील तिरुअनंतपुरम येथे ८,९०० कोटींच्या विझिंजम आंतरराष्ट्रीय खोल समुद्र-पाणी बहुउद्देशीय बंदराचे उद्घाटन केले. यावेळी, पंतप्रधानांनी केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन आणि काँग्रेस नेते शशी थरूर यांच्या मंचावर उपस्थितीवरून काँग्रेसवर टीका केली.

पंतप्रधान म्हणाले, 'मी मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की तुम्ही इंडिया आघाडीचे एक मजबूत आधारस्तंभ आहात. शशी थरूरही इथे बसले आहेत. आजचा कार्यक्रम अनेकांची झोप उडवून देणार आहे. संदेश जिथे पोहोचायला हवा होता तिथे गेला.
मोदींनी हे बंदर देशाच्या विकासासाठी एक मैलाचा दगड असल्याचे वर्णन केले. ते म्हणाले, हे बंदर ८,९०० कोटी खर्चून बांधण्यात आले आहे. येत्या काळात, येथे तिप्पट जहाजे ट्रान्स-शिप करता येतील. केरळ कार्यक्रमानंतर, पंतप्रधान मोदी यांनी आंध्र प्रदेशच्या अमरावती येथे ते ५८ हजार कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन केले.

## नागपूर मेट्रो स्टेशनला आग



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :
शुक्रवारी सकाळी वर्धा मार्गावरील रहाटे कॉलनी स्थानकाला आग लागली. त्यामुळे या मार्गावरची सेवा दुपारपर्यंत ठप्प होती. स्थानकावरील सौर पॅनलमध्ये शॉर्ट सक्रिट झाल्याने आग लागल्याचे महामेट्रोकडून सागण्यात आले. या घटनेचे चौकशीचे आदेश देण्यात आले आहे.

शुक्रवारी सकाळी ११.३० च्या सुमारास वर्धा मार्गावरील रहाटे कॉलनी स्थाकाला आग लागली. त्यामुळे दोन तासाहून अधिक काळ या मार्गावरील मेट्रोचे संचालन ठप्प झाले होते. त्याचा प्रवाशांना फटका बसला. यासंदर्भात संध्याकाळी महामेट्रोने निवेदन जारी केले.

त्यानुसार स्थानकावर लावण्यात आलेल्या सौर पॅनलमध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने सौम्य स्वरुपाची आग लागली होती. ती लगेच नियंत्रणात आणण्यात आली. या घटनेमुळे ५० मिनिटे मेट्रोचे संचालन थांबले होते, दुपारी १२.२० नंतर सेवा पूर्ववत झाल्याचा दावा करण्यात आला आहे. दरम्यान या प्रकरणाचे चौकशीचे आदेश महामेट्रो प्रशासनाने दिले आहेत.



जिल्हा नियोजन विकास समीती, वाशिम अंतर्गत वाशिम
नगर परिषद हद्दीतील ३०४.७१ लक्ष
रूपयांचे विकास कामाचे
भव्य भुमिपुजन

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | नगर परिषद वाशिम प्रभाग क्रमांक १ प्रकाश गांजरे यांचे घरापासुन ते वानखेडे यांच्या घरापर्यंत दोन्ही बाजुनी नालीसह सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | २९.५८ लक्ष |
| २ | नगर परिषद वाशिम शहरातील नाटयगृहाच्या बाहेर लादीकरण व इतर अनुषंगीत कामे करणे. | ८४.९९ लक्ष |
| ३ | नगर परिषद वाशिम वाल्मीकी नगर येथे सभागृहाचे बांधकाम करणे. | २५.०० लक्ष |
| ४ | नगर परिषद वाशिम प्रभाग क्रमांक १४ मध्ये पाळेश्वर रोड ते कैकाडी यांच्या घरासमोर महादेव मंदिराच्या आवारात कुंपन भिंतीचे बांधकम करणे. | ९.९७ लक्ष |
| ५ | नगर परिषद वाशिम प्रभाग क्रमांक १० मध्ये सराफा मार्केट आर.बी.ज्वेलर्स ते नगीना मज्जीद पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | १४.८६ लक्ष |
| ६ | नगर परिषद वाशिम प्रभाग ८ मध्ये शंकर बाबा रोड ते बालगोपाल तालीम पर्यंत सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | २९.७२ लक्ष |
| ७ | नगर परिषद वाशिम प्रभाग ४ आय.यु.डी.पी.कॉलणी, संत गजानन महाराज सेवा समिती परिसरात डोमशेडचे बांधकाम करणे. | ४२.०९ लक्ष |
| ८ | नगर परिषद वाशिम प्रभाग ४ अर्जुन खडसे ते पाईकराव, पिंटु इगळे यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | ६८.५० लक्ष |



शुभहस्ते
मा.आ.श्री.श्यामभाऊ खोडे
(आमदार वाशिम-मंगरूळनाथ विधानसभा)

दिनांक : शनिवार ०३/०५/२०२५ वेळ : सायंकाळी ४.०० पासुन
विनीत : भारतीय जनता पार्टी वाशिम शहर महायुती वाशिम



# नवी मुंबईत मविआला खिंडार

## ५५ नगरसेवकांनी मनपा निवडणुकीच्या तोंडावर शिंदेंचे नेतृत्व स्वीकारले

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
विधानसभा निवडणुकीनंतर ठाकरे गटाला मोठ्या प्रमाणात गळती लागली आहे. मागील अनेक दिवसांत अनेक पदाधिकाऱ्यांनी सत्ताधारी पक्षात प्रवेश केला आहे. आहे. नवी मुंबईतील ठाकरेंच्या १० नगरसेवकांनी मनपा निवडणुकीच्या तोंडावर शिंदेंचे नेतृत्व स्वीकारले आहे. यामुळे नवी मुंबईत उद्धव ठाकरेंना धक्का बसला आहे.



दरम्यान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत नवी मुंबईमधील काँग्रेस-राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे गटाच्या ५५ नगरसेवकांसह शेकडो पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. ठाण्यातील आनंदाश्रमात हा पक्ष प्रवेश पार पडला. यावेळी शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के उपस्थित होते.

एकनाथ शिंदे म्हणाले, तुम्ही खऱ्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. तुमचे सर्वांते मनापासून स्वागत करतो. नवी मुंबईतील एकूण ५५ नगरसेवक दाखल झाले आहेत. या सर्वांनी जो विश्वास दाखवला त्याला तडा जाऊ देणार नाही.

शिंदे म्हणाले की, या सर्वांच्या पक्षप्रवेशाने शिवसेनेची ताकद अधिक वाढली आहे. पक्षात दररोज होणारे पक्षप्रवेश शिवसेनेला अधिक बळकटी मिळवून देत आहेत. विधानसभा निवडणुकीने खरी शिवसेना कुणाची हा प्रश्न कायमचा निकाली काढल्याने आता पक्षात येणाऱ्यांची संख्या दिवसागणिक वाढत आहे.

आमच्यावर उठसुठ टीका करणाऱ्यांवर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. गेल्या अडीच वर्षात केलेल्या कामाच्या बळावर लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते शिवसेनेकडे आकृष्ट होत असून त्यामुळेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महापालिकांवर भगवा फडकल्याशिवाय राहणार नाही, असेही ते म्हणाले.

## जातीय जनगणनेचा निर्णय फसवा

■ **मुंबई :** केंद्र सरकारने जातीय जनगणना घेण्याचा निर्णय घेतल्याची घोषणा केली असली, तरी हा निर्णय फसवा असून जनतेच्या डोळ्यात धूळ फेकण्याचा प्रयत्न असल्याची घणाघाती टीका वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. पुण्यात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी केंद्र सरकारच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली.



आजवर केंद्र सरकारने जातीय जनगणना नेमकी कधी होणार याबाबत कोणताही स्पष्ट खुलासा केलेला नाही. उलट, सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांनीच नमूद केले आहे की, जातीय जनगणना करणे शक्य नाही. त्यामुळे हा निर्णय केवळ जनतेची दिशाभूल करण्यासाठी घेतल्याचे स्पष्ट होते, असा आरोप ॲड. आंबेडकर यांनी केला.

२०२६ मध्ये होणाऱ्या लोकसभा मतदारसंघांच्या परिसीमनाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने जाणूनबुजून जनगणना लांबवली आहे, असा संशय त्यांनी व्यक्त केला. जर जनगणनाच झालेली नसेल, तर जातीनिहाय जनगणना कशी होणार? याचे उत्तर केंद्राने द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली. पहलगाम येथे नुकत्याच झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा संदर्भ देत, या घटनेनंतर देशभरात संतापाची लाट पसरली असताना, जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी केंद्र सरकारने जातीय जनगणनेची घोषणा केली का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

## समता परिषदेच्या पाठपुराव्याला यश

■ **मुंबई :** केंद्र सरकारने घेतलेल्या जातनिहाय जनगणनेच्या क्रांतिकारी निर्णयाचे माजी उपमुख्यमंत्री आणि अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष छगन भुजबळ यांनी स्वागत केले आहे. या निर्णयामुळे मागासवर्गीय, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विमाप्र यांच्या सर्वांगीण विकासासाठी धोरणे आखणे शक्य होईल, असे त्यांनी सांगितले. तसेच, या निर्णयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारचे त्यांनी विशेष आभार मानले.



छगन भुजबळ म्हणाले, १९९२ पासून अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेने जातनिहाय जनगणनेची मागणी लावून धरली होती. २०१० मध्ये समीर भुजबळ आणि स्व. गोपीनाथ मुंडे यांच्यासह १०० खासदारांनी संसदेत ठराव मांडला होता. तसेच, सुप्रीम कोर्टात याचिकाही दाखल केली होती. या सततच्या पाठपुराव्याला आज यश मिळाले. त्यांनी सांगितले की, १८७१ ते १९३१ पर्यंत ब्रिटिशांनी दर दहा वर्षांनी जातनिहाय जनगणना केली, परंतु स्वातंत्र्यानंतर अनुसूचित जाती-जमाती वगळता इतर मागासवर्गीयांची गणना थांबली, ज्यामुळे ओबीसींना विकासापासून वंचित राहावे लागले.

हा निर्णय मागासवर्गीयांसाठी महत्त्वाचा असून, यामुळे शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि निवारा यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी स्वतंत्र निधी मिळेल, असे भुजबळ यांनी नमूद केले. तसेच, न्यायालयांना आवश्यक आकडेवारी मिळाल्याने राजकीय आरक्षण पूर्ववत होण्याचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या निर्णयामुळे वंचित घटकांना न्याय मिळेल आणि सामाजिक समतेकडे देशाची वाटचाल होईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

## भाजप कार्यालयाच्या भाडे करारास मुदतवाढ

■ **मुंबई :** मंत्रालय शेजारील मोक्याच्या जागी असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यालयाच्या भाडे करारास ३० वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार या भाडे कराराची मुदत आता ३१ डिसेंबर २०५४ पर्यंत राहणार आहे. सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय जारी केला.

१९८९ साली भाजपच्या प्रदेश कार्यालयासाठी मंत्रालय जवळील भारतीय जीवन विमा (एलआयसी) कार्यालयाच्या समोरील २ हजार ६८२ चौरस फूट आकाराची जागा भाडे कराराने देण्यात आली. या भाडे कराराला राज्य सरकारने वेळोवेळी मुदतवाढ दिली. या जागा वापराबाबतच्या भाडेकराराची मुदत ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपली होती. त्यामुळे १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०५४ अशा ३० वर्षाच्या भाडे करारास मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

भाडे कराराला मुदतवाढ देताना राज्य सरकारने प्रदेश भाजपला काही अटी घातल्या आहेत. त्यानुसार राज्य सरकारच्या प्रचलित दरानुसार सरकारला भाडे अदा करावे लागेल. विकास नियंत्रण नियमावलीनुसार बांधकाम करणे बंधनकारक असणार आहे. भाडे आणि भाडे थकबाकी वसुलीची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इलाखा शहरचे कार्यकारी अभियंता यांच्यावर देण्यात आली आहे.

## मीरा-भाईदरमध्ये हवाई टॅक्सी सेवा

■ **मुंबई :** मुंबई लगतच्या मीरा-भाईदर महापालिका क्षेत्रात लवकरच हवाई टॅक्सी सेवा सुरू होणार असून, या प्रकल्पासाठी महापालिकेने संबंधित संस्थेला सर्वेक्षण व आवश्यक परवानग्यांची मंजुरी दिली आहे. त्यामुळे हा प्रकल्प लवकरच प्रत्यक्षात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर रस्ते वाहतुकीवरील ताण कमी करण्यासाठी आणि मेट्रोला पूरक वाहतूक पर्याय देण्यासाठी हवाई टॅक्सी उपयुक्त ठरेल, असा विश्वास सरनाईक यांनी व्यक्त केला. डिसेंबर २०२५ मध्ये मीरा-भाईंदर शहर मेट्रो मार्गिकेवर येणार असून, हवाई टॅक्सीमुळे नागरिकांना जलद व सुलभ प्रवासाचा पर्याय उपलब्ध होईल.



घोडबंदर किल्ला, उत्तनचा सागरी परिसर, कांदळवन उद्यान यांसारख्या पर्यटन स्थळांसोबतच नव्या प्रकल्पांची जोड हवाई टॅक्सीमुळे मिळणार आहे. गुजरातमधील वडोदऱ्यात हवाई टॅक्सीचा यशस्वी प्रायोगिक प्रकल्प राबवला जात असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून प्रेरणा घेऊन ठाणे आणि मीरा-भाईंदरमध्येही या तंत्रज्ञानाचा वापर होणार आहे. हा प्रकल्प जे.पी. इन्फ्रास्ट्रक्चरसमोरील जागेत उभारण्यात येणार असून, शहराच्या वाहतूक व्यवस्थेसाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरेल, असे सरनाईक यांनी स्पष्ट केले.

## येणाऱ्या पिढीला आपण काय उत्तर देणार?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :
महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील यांनी एक भावनिक पत्र प्रसिद्ध करत मुंबई, महाराष्ट्र आणि माय मराठीच्या रक्षणासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन केले आहे. सध्या उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या एकत्र येण्याच्या चर्चेला वेग असताना, जयंत पाटील यांच्या पत्रामुळे राजकारणात नव्या घडामोडींचा संकेत मिळू शकतो.



जयंतराव पाटील आपल्या पत्रात म्हणतात, महाराष्ट्राचा ६५ वा स्थापना दिन साजरा करत असताना, आज आपल्या राज्याची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि औद्योगिक प्रगती लक्षवेधी आहे. पण त्याचवेळी अनेक आघाड्यांवर महाराष्ट्र पिछेहाटीला सामोरे जात आहे. महिलांवरील अत्याचार, पाण्याची टंचाई, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि मराठी भाषेची उपेक्षा, हे सगळं चिंतेचं कारण आहे.

त्यांनी आपल्या पत्रात संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील बलिदानांची आठवण करून दिली. १९५६ मध्ये मोरारजी देसाई यांच्या आदेशाने झालेल्या गोळीबारात अनेकांना हौतात्म्य आलं. १०६ हुतात्म्यांच्या बलिदानामुळेच आपल्याला मुंबईसह महाराष्ट्र मिळाला. आज त्या हुतात्म्यांचा विसर पडल्यास आपण इतिहासाशी अन्याय करत आहोत,असे ते म्हणाले.

पुढे बोलताना पाटील यांनी म्हटले की, आजचे राज्यकर्ते परक्यांसोबत महाराष्ट्राच्या वाटाघाटी करत आहेत. आपलेच लोक मराठी भाषेची गळचेपी करत आहेत. राज्याची ओळख आणि संस्कृती धोक्यात आली आहे. हे थांबवण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र यावे लागेल.

या पत्राच्या माध्यमातून त्यांनी स्पष्ट संदेश दिला आहे की, महाराष्ट्र वाचवण्यासाठी सर्व मराठी शक्तींनी एकत्र येणे काळाची गरज आहे. होत्याचं नव्हतं झालं तर येणाऱ्या पिढीला आपण काय उत्तर देणार?असा खणखणीत सवाल करत त्यांनी सर्वांना विचार करायला लावले आहे. जयंतराव पाटील यांच्या या भावनिक पत्रामुळे राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता असून आगामी घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागले आहे.

## रक्त तपासणी विभागात एसी यंत्रणा कोलमडली

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
राज्यातील अग्रगण्य जे.जे. रुग्णालयातील रक्त तपासणी विभागातील वातानुकूलित यंत्रणा बंद पडल्यामुळे रुग्ण आणि कर्मचारी यांना तीव्र उन्हामुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तपासणी विभागात एकूण पाच एसी यंत्रणा लावण्यात आल्या आहेत, मात्र त्यातील केवळ एकच एसी सुरू असून उर्वरित चार यंत्रणा बंद आहेत.



रक्त तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी असताना, विभागात उष्म्यामुळे घामाघूम स्थिती निर्माण झाली आहे. एका बाजूला आजारपणाने ग्रस्त रुग्ण, तर दुसऱ्या बाजूला तपासणी करणारे टेक्निशियनही उष्णतेने त्रस्त झाले आहेत. या असह्य परिस्थितीत तपासण्या सुरळीत पार पडणे अवघड झाले आहे.

यातच रुग्णालयाच्या बाजूलाच नव्या सुपर स्पेशालिटी इमारतीचे काम सुरु असून, सुरक्षेसाठी लावलेले मोठमोठे पत्रे खिडक्यांवर आडवे असल्याने नैसर्गिक हवाही आत येत नाही. त्यामुळे विभागात गरम आणि दमट वातावरण निर्माण झाले आहे.

रुग्णांच्या आरोग्यासोबतच कर्मचारी वर्गाच्या कार्यक्षमतेवरही याचा विपरीत परिणाम होत असल्याचे निरीक्षण आहे. प्रशासनाने तातडीने एसी यंत्रणा दुरुस्त करून कार्यरत कराव्यात, अशी मागणी रुग्ण आणि कर्मचाऱ्यांकडून होत आहे.

## मनपाची थेट कारवाई

■ मुंबई, दि. २ :
मुंबईत रस्ते काँक्रिटीकरण कामात निष्काळजीपणा करणे मनपा अधिका?्यासह कंत्राटदाराला चांगलेच महागात पडले आहे. या प्रकरणात महानगर पालिकेतील दुय्यम अभियंत्याला निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणात कंत्राटदाराला ५० लाख रुपयांचा दंड बजावण्यात आला आहे. इतकेच नाही तर या कामावर गुणवत्ता देखरेख संस्थेलाही २५ लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

रस्ते काँक्रीटीकरणाच्या कामात निष्काळजीपणा केल्याच्या आरोपावरून संबंधित दुय्यम अभियंत्याला निलंबित करण्यात आले आहे. निकृष्ट दर्जाचे काम केल्याबद्दल संबंधित कंत्राटदारावर ५० लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. कामाच्या गुणवत्तेची योग्य तपासणी न केल्यामुळे संबंधित गुणवत्ता देखरेख संस्थेला देखील २५ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

## 'हाउस अरेस्ट' शो बंद करा

### राज्य महिला आयोगाचे पोलिसांना पत्र

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
उल्लू ॲपवरील एजाज खानचा 'हाउस अरेस्ट' हा शो बंद करण्याच्या मागणीने जोर धरला आहे. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर या देखील या शो बाबत आक्रमक झाल्या असून त्यांनी शो वर बंदी घालण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्याचे पोलिस महासंचालक यांना पत्र लिहिले असून कारवाईच्या सूचना दिल्या आहेत.

अभिनेता एजाज खानच्या 'हाऊस अरेस्ट' या शोवरून वाद निर्माण झाला आहे. या शोवर अश्लीलता पसरवल्याचा आरोप आहे. या शोची एक व्हिडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामध्ये, एका टास्कदरम्यान, महिला स्पर्धकांना त्यांचे कपडे काढण्यास भाग पाडले जात आहे. सोशल मीडियावर लोक या शोविरुद्ध संताप व्यक्त करत असून आणि तो त्वरित बंद करण्याची मागणी करत आहेत. याआधी भाजपच्या आमदार चित्रा वाघ आणि ठाकरे गटाच्या खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी देखील हा शो बंद करण्याबाबत मागणी केली आहे.

राज्य महिला आयोगाने याची स्वाधिकारे दखल घेतली आहे. हाऊस अरेस्ट या शोचे प्रसारण बंद करावे अशा सूचना आयोगाने पोलिसांना दिल्या आहेत.

## राष्ट्रीय कर परिषदेचे पुण्यात आयोजन



■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २ :
महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या (एमटीपीए) वतीने 'अमृत ज्ञानकुंभ २०२५', या दोन दिवसीय राष्ट्रीय कर परिषदेचे आयोजन ३ व ४ मे रोजी करण्यात आले आहे.

गणेशखिंड रस्त्यावरील कॉसमॉस टॉवरमधील सहकार भवनात ही दोन दिवसांची परिषद होणार असून, 'कर सल्लागार : पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे आधारस्तंभ' अशी या राष्ट्रीय कर परिषदेची संकल्पना आहे.

ऑल इंडिया फेडरेशन ऑफ टॅक्स प्रॅक्टिशनर्स (एआयएफटीपी), जीएसटी प्रॅक्टिशनर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन (एनएमटीपीए) या संस्थांच्या सहकार्याने ही राष्ट्रीय कर परिषद होत आहे, अशी माहिती राष्ट्रीय कर परिषदेचे चेअरमन ॲड. नरेंद्र सोनवणे व 'एमटीपीए'चे अध्यक्ष ॲड. प्रसाद देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी व्हाईस चेअरमन सीएमए श्रीपाद बेदरकर, 'एमटीपीए'चे उपाध्यक्ष ॲड. अनुरुद्र चव्हाण उपस्थित होते.

ॲड. नरेंद्र सोनावणे म्हणाले, शनिवारी सकाळी ९.४५ वाजता केंद्रीय सहकार व हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन होणार आहे. पहिल्या दिवशी सीए असित शाह, ॲड. दीपक बापट यांचे 'इनपुट टॅक्स क्रेडिटमधील अडचणी, बनावट बिले व त्यासंदर्भातील नियम' यावर, तर डॉ. गिरीश अहुजा व ॲड. नारायण जैन यांचे 'डायरेक्ट टॅक्स कोड'यावर तांत्रिक मार्गदर्शन सत्र होईल.

दुसऱ्या दिवशी सकाळी 'भारतीय न्याय संहिता आणि प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर यातील परस्परसंबंध' यावर ॲड. मकरंद आडकर, सीए सुहास बोरा, सीए ईशान पाटकर, सीए योगेश इंगळे यांचे मार्गदर्शन सत्र होणार आहे. शिवाय इतर सत्रात कार्यक्रम होतील.

## गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाला प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :
संयुक्त महाराष्ट्राच्या उभारणीचा इतिहास राष्ट्रवादी काँग्रेसने नव्या पिढीपुढे मांडला आहे. याचा निश्चितच फायदा होणार आहे, असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव २०२५'च्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले.

वरळीच्या जांबोरी मैदानात पार पडलेल्या या भव्य महोत्सवात पाच दालनांतून महाराष्ट्राच्या इतिहासाचा, संस्कृतीचा आणि विचारांचा ठसा उमटवण्यात आला. अजित पवार, प्रफुल पटेल, छगन भुजबळ, सुनिल तटकरे यांच्या उपस्थितीत महोत्सवाचे उद्घाटन झाले.

या वेळी अजितदादांनी सांगितले की, बेळगाव, कारवारचा भाग महाराष्ट्रात यायचा आहे तोवर लढा सुरू राहील. शिव - शाहू - फुले - आंबेडकरांचे विचार कधीही सोडणार नाही, असा निर्धार त्यांनी केला. प्रफुल पटेल यांनी अजितदादांच्या मनातही 'राम' आहे असे म्हणत विरोधी पक्षांवर निशाणा साधला.

## पंकजाला अश्लील मेसेज अमोल काळेला अटक

■ मुंबई, दि. २ :
भाजप नेत्या आणि मंत्री पंकजा मुंडे यांना अश्लील आणि त्रासदायक मेसेज पाठवणारा अमोल काळे या आरोपीला पुण्यातून अटक करण्यात आली आहे. तो गेल्या काही दिवसांपासून पंकजा मुंडेंना मोबाईल कॉल व मेसेजद्वारे मानसिक त्रास देत होता.

पंकजा मुंडे यांच्या कार्यालयाकडून संबंधित व्यक्तीविरोधात मुंबई सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती. तक्रारीनंतर पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे तपास करत आरोपीचा माग काढला आणि पुण्यातून त्याला अटक केली.









■ **जालना :** येथील महाराणाप्रताप नगर येथे १५ कुलदेवीची शोभायात्रा काढण्यात आली. महासागरमध्ये आयकर विषयक सदर लिहिणारे सीए गोविंदप्रसाद मुंदडा यांनी शोभायात्रेची छायाचित्रे उपलब्ध करून दिलीत.

## प्रजापिता ब्रम्हाकुमारी विश्व विद्यालयातर्फे महाराष्ट्र दिन व कामगार दिन

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २ :
प्रजापीता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय डोंबिवली सेंटरच्या वतीने १ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन केंद्रात साजरा करण्यात आला. या वेळी संयुक्त महाराष्ट्र चळवळीबाबत माहिती देण्यात आली.

जागतिक कामगार दिनानिमित्ताने नाक्यावरील पुरुष कामगार आणि महिला कामगारांना सन्मानित करण्यात आले. त्यांना तुळस रोपटे, प्रतिमा आणि फराळ देण्यात आला. कामगारांना व्यसनापासून दूर राहण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी कामगारांना कलावती बेहन, संगीता बेहन, मनीषा बेहन, तेजा बेहन, यांनी मार्गदर्शन केले.



कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावदेवी विदयामंदिर शाळेचे संचालक अध्यक्ष शिक्षण महर्षी केशव भाई भोईर, प्रतीक्षा बेहन, सारंगी बेहन, किरण गोदरेज, रित्विक करकेरा, जोशी बेहन आणि शीतल बेहन व केंद्रातील सहकाऱ्यांनी परीश्रम घेतले.

# भ्याड दहशतवादी हल्ला!



किसी मुल्क को बर्बाद करना हो तो लोगो को धर्म के नाम पर लढा दिजिए, मुल्क अपने आप बर्बाद हो जायेगा - लियो टॉलस्टाय यांचे उद्गार आज खरे ठरत आहेत.

२२ एप्रिल २०२५ रोजी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष बेन्स हे भारतात होते, पंतप्रधान नरेंद्र मोदी सौदी अरेबियात होते. भारताचे नंदनवन असलेल्या काश्मीरमध्ये देशाच्या विविध भागातून आलेले हजारो पर्यटक निसर्ग सौंदर्याचा मनसोक्त आनंद लुटत होते. काश्मीरच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला पर्यटन व्यवसाय बहरत असतांना दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये २६ पर्यटकांना समोरून गोळ्या घातल्या.

त्याची प्रतिक्रिया म्हणून देशात संतापाची लाट उसळणे नैसर्गिक होते. या वेळी समस्त विरोधी पक्षांनी सरकारला दिलेला एकमुखी पाठिंबा आणि विविध मुस्लीम संघटनांनी दिलेला संयमी आणि संवेदनशील प्रतिसाद हे सरकारसाठी जमेचे मुद्दे आहेत. पुलवामाप्रमाणेच यावेळीही सुरक्षा यंत्रणेबाबत काही शंका आहेत.

पहलगाम हे पर्यटकांचे मोठे आकर्षण स्थळ आहे. सर्व देशातून काश्मीरमध्ये येणारे पर्यटक श्रीनगर, गुलमर्ग आणि पहलगाम येथे हमखास येतात, पहलगाम हे भारत-पाकिस्तान सरहद्दपासून बरेच दूर आहे. सरहद्दीपासून पहलगामला पोहोचायला ८ तास तरी लागतातच.

अशा दूर अंतरावर पाकिस्तानमधून आलेले प्रशिक्षित व सशस्त्र दहशतवादी पोहोचले तरी कसे? हे गूढ अजून उकललेले नाही. किश्तबाडमधून त्रालच्या दाट जंगलातून हे पायपीट करुन आले असण्याची शक्यता आहे. पण ते पहलगामला पोहोचून तेथे पर्यटकांचे रक्ताचे सडे उडवेपर्यंत जम्मू-काश्मीर पोलीस, सीमा सुरक्षा दल, केंद्रीय राखीव सुरक्षा दल, निमलष्करी दले आणि लष्करी सैन्यदलाला सुद्धा त्याचा चांगपत्ता लागला नाही, याचे मोठे आश्चर्य वाटते.

जम्मू काश्मीर हा देशातील सर्वांत मोठा संवेदनशील व हाय सिक्युरिटी झोन आहे. पाकिस्तानच्या सरहद्दीला लागून हे राज्य आहे. २४ तास डोळ्यांत तेल घालून तेथे घडणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवले जाते, मग यावेळी आपण कमी कुठे पडलो?

सुमारे दोन हजार पर्यटक असलेल्या ठिकाणी एकही सुरक्षा रक्षक नसणे, गुप्तचर यंत्रणेला सुगावा न लागणे याची जबाबदारी कोणाची? काश्मीरचे स्थित्झर्लंड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरन खोऱ्यात निरपराध व निष्पाप पर्यटकांच्या हत्याकांडाने रक्ताचा सडा पडला. एवढा मोठा रक्तपात काश्मीर खोऱ्यात कित्येक वर्षांत घडला नव्हता.

त्या दिवशी पहलगाम परिसरात २५०० पर्यटक होते, बेसरनच्या पठारावर मराठी, हिंदी, कन्नड, तमिळ, गुजराती असे विविध भाषिक पर्यटक जमले होते. दहशतवाद्यांनी कुणालाही त्यांची जात, त्यांचा प्रांत किंवा त्यांची भाषा कोणती असा प्रश्न विचारला नाही, तर ते कोणत्या धर्माचे आहेत एवढाच प्रश्न विचारत होते, काहींनी पर्यटकांकडे आधारकार्ड व ड्रायव्हिंग लायसन्सची मागणी केली.

पहलगाममध्ये २५०० पर्यटक असतांना ज्या बेसरनमध्ये हत्याकांड घडले त्याच्या जवळपास कुठेही सुरक्षा व्यवस्था नव्हती, कुठेही पोलीस चौकी नव्हती, कुठेही गस्त नव्हती. दहशतवाद्यांना रोखायला कोणतीच सुरक्षा यंत्रणा नसावी हे असे कसे घडू शकते? विशेष म्हणजे गोळीबार झाल्यावर व २६ पर्यटकांची हत्या झाल्यावर दहशतवादी तिथेच काही काळ होते पण सुरक्षा व्यवस्थेला काही कळू शकले नाही, हे चिंताजनक आहे.



**प्रविण बागडे**
**नागपूर. 9923620919**
pravinbagde@gmail.com

दहशतवादी निश्चितच ह त्या का ं ड घडविण्यापूर्वी अगोदर आलेले असणार, ते काही बंदुका हातात येऊन जंगलात फिरत बसणार नाहीत, मग ते कुठे राहिले, कुठे जेवले, त्यांना मदत करणारे स्थानिक कोण आहेत? घटनेनंतर अनेक दिवस उलटले तरी त्याचा तपशील बाहेर आला नाही.

पाकिस्तानच्या सीमेवरून दहशतवादी घुसले तेव्हा आपले सुरक्षा दल कुठे कुठे होते? दहशतवादी हे पोलिसांच्या किंवा लष्करी सैनिकांच्या गणवेषात पहलगामला आले होते, त्यांना सुरक्षा दलाचे गणवेष कुणी पुरवले? ते त्यांनी कुठे अंगावर घातले? अंगावरचे कपडे कुठे बदलले व कुठे लपवून ठेवले?

मोदी सरकारच्या दोन कारकिर्दीत पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याने सर्व देशाचा थरकाप उडला होता. दहशतवादी देशात कसे घुसले? तिथपर्यंत कसे पोहोचले, सुरक्षा दलाच्या जवानांना घेऊन जाणाऱ्या बसपर्यंत ते कसे पोहोचू शकले? साडेचारशे किलो आरडीएक्स हाय सिक्युरिटी झोनमध्ये कसे येऊ शकले? सुरक्षा दलाचे जवान विमानाने न जाता बसेसमधून प्रवास करीत आहेत ही माहिती दहशतवाद्यांपर्यंत कशी पोहोचली? पुलवामा हल्ला करणारे दहशतवादी कोण आहेत, कुठे आहेत?

पुलवामाचा बदला म्हणून भारतीय सैन्य दलाने पाकिस्तान व्याप्त काश्मीरमध्ये घुसून बालाकोटला एअर स्ट्राईक करून दहशतवाद्यांचे असंख्य अड्डे उद्ध्वस्त केले असे सांगितले गेले, मग त्यानंतरही काश्मीरवर दहशतवादी हल्ले कसे चालू राहिले? तेव्हा ४४ सुरक्षा दलाच्या सैनिकांची हत्या झाल्यावर इंटेलिजन्सचे अपयश म्हणून आरोप झाले.

आता पहलगाम पर्यटकांच्या हत्याकांडानंतरही इंटेलिजन्सवर खापर फोडले जात आहे. पुलवामा हत्याकांडानंतर जम्मू-काश्मीरचे तत्कालीन उपराज्यपाल सतपाल मलिक यांनी त्या घटनेबाचत सरकारला दोष दिला होता. सरकारने दुर्लक्ष केले, असे म्हटले होते. पण त्या घटनेला कोण जबाबदार आहे हे कधी समजलेच नाही.

पहलगाम हत्याकांडाची जबाबदारी पाकिस्तान स्थित लष्कर-ए-तोयबाशी संलग्न असलेल्या द रेजिस्टेंस फ्रंट ने घेतली होती ती नंतर घुमजाव करून झटकली. दहशतवादी दक्षिण काश्मीरमधील कोकेरनाग येथून किश्तवाड मार्गे बेसरनला पोहोचले.

बर्फाच्छादीत पर्वतांनी वेढलेल्या बेसरनच्या पठारावर दहशतवादी दुपारी ३ वाजता पोहोचले तेव्हा देशाच्या विविध भागांतून आलेले पर्यटक त्यांच्या मित्रमंडळी व परिवारासह मौज-मजा मस्तीत आनंद लुटत होते. आपल्याला कोणी प्रतिकार करणारे नाही, पर्यटक निःशस्त्र आहेत. जवळपास कुठेही सुरक्षा व्यवस्था नाही. हे दहशतवाद्यांना पूर्ण ठाऊक असावे. बेसरनपासून ५ किमी अंतरावर सीआरपीएफचा कॅम्प आहे, पण त्याची सुद्धा दहशतवाद्यांना पर्वा नव्हती.

मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २०० निरपराध मुंबईकरांचा बळी गेला. मुंबई पोलीस दलातील धाडसी व आक्रमक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनाही दहशतवाद्यांशी लढतांना मरण आले, पण मुंबई सर्व दहशतवादी पोलिसांनी आलेले सर्व दहशतवादी वेचून-वेचून ठार मारले. एवढेच नव्हे तर अजमल कसाबला पोलिसांनी जिवंत पकडला व पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा सर्व जगाला दाखवला, त्याच कसाबला नंतर फाशी झाली. ■ ■ ■

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

# भ्रष्टाचार थांबणार तरी कधी?

भारत देश एकीकडे आर्थिक महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहे तर दुसऱ्या बाजूने भ्रष्टाचाराची कीड भारतीय व्यवस्थेला खिळखिळी करत आहे. आजमितीला गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचार बोकाळला आहे. प्रचंड स्वार्थ, आर्थिक हाव, असमाधानी वृत्ती आणि मुजोरी ही या भ्रष्टाचाऱ्यांची प्रमुख लक्षणे आहेत.

'सरकारी काम आणि सहा महिने थांब' अशी स्थिती आज प्रत्येक खात्याची झाली आहे. काम लवकर करून घ्यायचे असेल तर तुम्हाला टेबलाखालून पाकीट द्यावेच लगेच हा सरकारी खात्यांचा जणू अलिखित नियम बनला आहे. भ्रष्टाचारावर आळा बसण्यासाठी केंद्र सरकारने अनेक सरकारी व्यवहार डिजिटल केले आहेत; मात्र भ्रष्ट अधिकाऱ्यांनी त्यातूनही भ्रष्टाचाराच्या विविध वाटा शोधून काढल्या आहेत.

आज देश मोठ्या युद्धाच्या तयारीत आहे त्यासोबत गृहयुद्ध भडकू नये याचीही सिद्धता करत आहे, तर दुसऱ्या बाजूने सरकारी अधिकारी भ्रष्टाचाराच्या धनातून आपल्या पुढच्या कित्येक पिढ्यांची सोय करत आहेत. इतरांच्या कष्टाचा पैसा ओरबाडून यांच्या पुढच्या पिढ्या खरोखर सुरक्षित जीवन जगणार आहेत का?



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

यंदाच्या वर्षात राज्यात उघड झालेल्या भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा अहवाल आला असून यंदा राज्याच्या महसूल खात्याने पोलीस खात्यालाही मागे टाकले आहे. १ जानेवारी ते ७ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात २१२ प्रकरणांत सापळे रचून ३०८ सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांना अटक करण्यात आली आहे. ज्यामध्ये महसूल खात्याचे ५६ तर पोलीस खात्याचे ३१ कर्मचारी आणि अधिकारी आहेत.

सर्वच सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार असल्याने अन्य प्रकरणे ही अन्य सरकारी खात्यांच्या संदर्भातील आहेत ज्यामध्ये पंचायत समिती मधील २५, महावितरण खात्यातील मधील १२ , महापालिका प्रशासनातील १०, जिल्हा परिषदेतील १०, आरोग्य विभागातील १० आणि शिक्षण विभागातील ८ प्रकरणे उघडकीस आली आहेत .

प्रत्येक सरकारी कार्यालयात 'लाच देणे आणि घेणे हा गुन्हा आहे' अशा स्वरूपाची पाटी लावलेली असते; मात्र या पाटीखालीच सवार्धीक प्रमाणात लाच मागितली जाते आणि ती दिलीही जाते. लाच मागणाऱ्याच्या विरोधात तकार प्रविष्ट करण्याचे आवाहन लाच-लुचपत खात्याकडून वेळोवेळी केले जाते, त्यासाठी जागृतीही केली जाते ज्याचा परिणाम म्हणून लाच मागणाऱ्यांच्या विरोधात तक्रार करणाऱ्यांचे प्रमाण पूर्वीच्या तुलनेत नक्कीच वाढले आहे; तरीही आपली कामे लवकर करून घेण्यासाठी या भ्रष्टाचाऱ्यांची पोटे भरणाऱ्यांचीही या देशात कमी नाही.

शहरांसारख्या प्रगतशील भागांत शासकीय अखत्यारीतील काही क्षेत्रांत ऑनलाईन अर्ज प्रक्रिया आणि डिजिटलायझेशन यांमुळे सामान्य जनतेचा सरकारी अधिकाऱ्यांशी थेट संपर्क येत नसल्यामुळे भ्रष्टाचारावर काही अंशी अंकुश आला असला, तरी ग्रामीण भागातील अशिक्षित जनतेची भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून लहान सहान कामांत सर्रासपणे लुबाडणूक सुरु आहे.

कर्तव्यभावनेला तिलांजली देऊन जडलेल्या भ्रष्टाचाराच्या सवयीमुळे सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांमध्ये काम टाळण्याची वृत्ती निर्माण होत आहे. सामान्य नागरिकांच्या मासिक वेतनातून कररूपाने सरकार दरबारी जाणाऱ्या पैशातून ही सरकारी मंडळी गलेलठ्ठ वेतन घेत असतात. तरीही यांची भूक भागत नाही म्हणून त्याच अन्नदात्याच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन त्याला लुबाडतात.

शिपायापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची एकसंध साखळी असल्याने खालचा अधिकारी कामाचे पैसे मागतो म्हणून वरच्या अधिकाऱ्याकडे तक्रारही करता येत नाही. सरळमार्गाने काम करून घायचे असेल, तर त्यासाठी सरकार दरबारी अनेकदा चकरा माराव्या लागतात. पुन्हा पुन्हा कामाचे खाडे नकोत म्हणून सामान्य नागरिक अधिकाऱ्याच्या मागणीप्रमाणे पैसे देतो आणि आपला वेळ वाचवतो, अशा प्रकारची ही प्रक्रिया सरकारी कार्यालयांत अविरतपणे सुरु असते.

सामान्य नागरिक वेळ आणि कार्यालयाच्या सुट्या वाचवण्यासाठी भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असतो. अर्थात या भ्रष्ट क्षेत्रामध्येही काही कर्तव्यनिष्ठ आणि कार्यतत्पर अधिकारी असतात; मात्र यांची संख्या तुलनेने कमी असल्याने सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. मासिक वेतनाव्यतिरीक्त अधिक पैसे मिळावेत, कमी मालाच्या मोबदल्यात जास्त नफा मिळावा यासाठी सामान्य व्यक्तीला लुबाडणे, त्याची फसवणूक करणे, त्याच्यावर दबाव आणणे, त्याला परावृत्त करणे यांसारखे सर्व प्रकार भ्रष्टाचारामुळे घडतात आणि यामागे दडलेला असतो तो कमालीचा स्वार्थ.

तो साधण्यासाठी इतरांचे कितीही नुकसान झाले तरी चालेल पण माझा स्वार्थ साधला जायला हवा ही असुरी वृत्ती, झटपट श्रीमंत होण्याची असूया आणि माझे कोणी वाकडे करू शकणार नाही ही मुजोरी. भ्रष्टाचारासाठी दिलेला पैसा हा सामान्य माणसाच्या मेहनतीचा आणि प्रामाणिकपणे काम केल्याचा मोबदला असतो.

इच्छा नसतानाही तो इतरांना बहाल करताना त्यामागे त्याचा तळतळाटसुद्धा असतो त्यामुळे भ्रष्टाचाऱ्याच्या तो कितपत पचनी पडणार? अध्यात्मशास्त्रानुसार वैयक्तिक स्वाथार्साठी गैरमार्गाने इतरांकडून धन लुबाडणे हे फार मोठे पाप असून त्याच्या फळस्वरूपात लुबाडणाऱ्याची या नाहीतर पुढील जन्मात निश्चितपणे कित्येक पटीने हानी होते.

■ ■ ■

# चित्रकर्मीतील एक अग्रणी!

भालचंद्र पेंढारकर अर्थात अण्णा हे अत्यंत व्यासंगी, शिस्तबद्ध आणि रंगभूमीवर अमाप श्रद्धा असणारे रंगकर्मी होते. तिसरी घंटा जाहीर केलेल्या वेळेवरच देणारे आणि त्याच क्षणी बुकिंगची पर्वा न करता नाटक सुरू करणारे एकमेव निमार्ता आणि अभिनेते होते. मुंबई साहित्य संघात त्यांची स्वतःची रेकॉर्डिंग रूम होती. त्यात त्यांनी असंख्य नाटके रेकॉर्ड करून ठेवलेली आहेत.. त्यांत प्रायोगिक नाटके, संघात झालेल्या प्रत्येक नवीन प्रयोगाचे ध्वनिमुद्रण त्यांनी केले होते.

--------------

भालजी पेंढारकर हे भारतीय चित्रपटसृष्टीचा पाया घालणाऱ्या चित्रकर्मींमधले अग्रणी चित्रपट दिग्दर्शक, निर्माते, पटकथालेखक, संवादलेखक आणि गीतकार होते. भालजींचा जन्म २ मे १८९८ रोजी कोल्हापूर संस्थानचे तत्कालीन सहायक शल्य ।चिकित्सक डॉ. गोपाळराव आणि राधाबाई पेंढारकर यांच्यापोटी कोल्हापुरात झाला.



निर्माते-अभिनेते बाबूराव पेंढारकर हे त्यांचे ज्येष्ठ बंधू. चाकोरीबद्ध शालेय शिक्षणात मन न रमलेल्या भालजींनी तरुणवयातच कोल्हापूर सोडले. सुरुवातीच्या काळात पुण्यात केसरी या वृत्तपत्रात नोकरी, छत्रपती शाहूमहाराजांच्या रायबाग कॅम्पमध्ये वास्तव्य आणि सैन्यात भरती काहीशी अशी भटकंती करत ते कोल्हापूरला परतले.

भालजी पुण्यात असताना त्यांनी केसरीचे अंक घरोघरी पोहोचवणे, विकणे अशी कामे केली; पण त्यातून उरलेल्या वेळात त्यांनी केसरीचे जुने अंक-विशेषतः लोकमान्य टिळकांचे जहाल अग्रलेख, चिपळूणकर, मोडक, विजापूरकरांच्या ग्रंथमाला, पुस्तके, चरित्रे असे साहित्य वाचले. त्यांच्यातल्या लेखकावर या सगळ्यांचे संस्कार झाले.

पुण्यातल्या लक्ष्मी थिएटरचे व्यवस्थापक रुस्तमजी मोदी (सोहराब मोदींचे बंधू) यांनी त्या काळी मूकपटांच्या वरच्या भागात इंग्रजी उपशीर्षकांची मराठी भाषांतरे देण्याची पद्धत सुरू केली होती. भालजींना वर्तमानपत्रात स्फुटे लिहिण्याबरोबरच हे मराठी भाषांतराचे कामही मिळाले. पुढे त्यांनी सिनेमा समाचारमधून चित्रपटांची परीक्षणेही लिहिली. १९२१ मध्ये भालजींनी संगीत कायदेभंग, भवितव्यता, क्रांतिकारक, राष्ट्रसंसार, आसुरी लालसा आणि अजिंक्यतारा ही सहा नाटके लिहिली, त्यांत अभिनयही केला.

भारताला स्वातंत्र्य मिळाले होते. गुलामगिरीच्या जोखडातून मुक्त झाल्याच्या भावनेचा व स्वातंत्र्याचा दिव्य संदेश भालजींनी आपल्या चित्रपटांतून दिला. बहिर्जी नाईक, नेताजी पालकर, मोहित्यांची मंजुळा यांतील संवादांमधून भालजींनी दुबळेपणा व लाचारीविरुद्ध शाद्बिक आसूड ओढले.

स्वातंत्र्य मिळाले तरी सुराज्य निर्माण करण्यासाठी त्याग, निष्ठा, औदार्य व संयमी असा खंबीरपणा आणि आत्मविश्वास असलेली तरुण पिढी तयार व्हावी यासाठी त्यांनी समृद्ध आशयासह कला व तंत्र या दोन्ही दृष्टिकोनातून उत्कृष्ट अशा चित्रपटांची निर्मिती केली.

भालजींचे चित्रपट किंवा त्यांची निर्मिती संस्था म्हणजे कलाकार व तंत्रज्ञ घडवणारी एक मोठी कार्यशाळाच होती. तसेच त्यांचा संच म्हणजे कुटुंबच होते. शिस्तबद्धता, वेळापत्रकानुसार काम, कामांचे नेटके वाटप, स्तोत्रपठण, प्रार्थना, रेखीव दिनक्रम, वगैरे... चित्रपटाच्या माध्यमातून भालजींनी सुलोचनादीदी, चंद्रकांत मांडरे, सूर्यकांत मांडरे, जयश्री गडकर असे असंख्य कलाकार घडवले.

शिवाजीचा काळ आणि त्या काळातील व्यक्तिरेखा व प्रसंग ही भालजींच्या चित्रपटांची प्रमुख वैशिष्ट्ये होती. त्यांच्या युगप्रवर्तक अशा कारकिदीर्मुळे भालजींना यथार्थतेने चित्रतपस्वी असे म्हटले जाते. १९४८ मध्ये गांधीजींची हत्या झाल्यानंतरच्या दंगलीमध्ये भालजींचा कोल्हापूर येथील जयप्रभा स्टुडिओ जाळला गेला. नुकताच तयार झालेला मीठभाकर व बाळ गजबरांचा मेरे लाल हे चित्रपट आगीत भक्षस्थानी पडले. दीडशे ते दोनशे कामगार बेकार झाले.

भालजींनी पुन्हा लाखो रुपये खर्चून जयप्रभास परत उभे केले. जिद्दीतून मीठभाकर व मेरे लालची पुनर्निर्मिती केली. मीठभाकरने चांगला व्यवसाय केला. भालजींनी कोल्हापुरात मराठी चित्रनिर्मितीस पुन्हा एकदा वेग मिळवून दिला.

भालजी पेंढारकरांच्या बोलपटांच्या सुरुवातीलाच बहु असोत सुंदर, आकाशवाणी, पार्थकुमार, कालियामर्दन, सावित्री अशी सुरू झालेली त्यांची कारकीर्द नेताजी पालकर, थोरातांची कमळा, वाल्मिकी, मीठभाकर, छत्रपती शिवाजी, गाठ पडली ठका ठका, मोहित्यांची मंजुळा अशी वळणे घेत गेली.

साधी माणसं, गनिमी कावा आणि शेवटचा शाब्बास सूनबाई असे तब्बल पंचेचाळीस चित्रपट त्यांनी चित्रपटसृष्टीला दिले. या चित्रपटांत ते दिग्दर्शन, कथा, पटकथा, संवाद किंवा निर्मिती या नात्याने कार्यरत होते. अशा या श्रेष्ठ चित्रमहर्षीचे- भालजींचे कोल्हापूर येथे २६ नोव्हेंबर १९९४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या युगप्रवर्तक अशा कारकिदीर्मुळे भालजींना यथार्थतेने चित्रतपस्वी असे म्हटले जाते. भारतीय चित्रपटसृष्टीच्या अप्रगत अशा कालखंडात मूकपटापासून सुरुवात करत उत्तमोत्तम बोलपट निर्माण करून चित्रपटसृष्टीचा भक्कम पाया घालणारे सर्जनशील, प्रयोगशील चित्रपटकर्मी म्हणून त्यांचे नाव भारतीय कलेच्या इतिहासात कायमचे नोंदले गेले आहे. चित्रतपस्वी भालजी पेंढारकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !!

■ ■ ■



**कृष्णकुमार आनंदी गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**

# विरोधासाठी विरोध नवा राजकीय मंत्र

भारतीय लोकशाहीमध्ये सरकार काहीही निर्णय घेईल, की विरोधकांचा 'आक्रोश अलार्म' वाजतो. सरकार म्हणालं...जनतेसाठी मोफत ऑक्सिजन, तर विरोधक ओरडतात... हा ऑक्सिजन उद्योगाचा अपमान आहे! सरकार परीक्षा ऑनलाइन घेणार म्हटलं, तर लगेच प्रतिक्रिया... विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर गदा! अलिकडेच पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाला. सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली... सर्वांनी एकमताने सांगितले की ते सरकारसोबत आहेत... बाहेर आल्यानंतर आठवले... हे काय आहे, आम्ही निषेध केला नाही. मग सरकारचे अपयश काय होते... सिंधू करार कसा मोडता येईल... शिरच्छेदित पंतप्रधानांच्या प्रतिकात्मक चित्रावरून सरकारचा विरोध... सरकारमधील लोकांचे दहशतवादी संबंध आहेत हे उघड करण्यात विरोधकांनी वेळ वाया घालवला नाही.



त्यांना हेही माहित नाही की जेव्हा देशाच्या सुरक्षेचा प्रश्न येतो तेव्हा सरकारला बंद दाराआड प्रश्न विचारले पाहिजेत... आमचे श्रीमान ओवेसी त्यांच्यापेक्षा चांगले निघाले... जे खुल्या व्यासपीठावरून पाकिस्तानच्या घृणास्पद कृत्यांचे उघडपणे चांगला समाचार घेत आहेत. पण विरोधी पक्ष आपली परंपरागत मते सुरक्षित करण्याचा प्रयत्न करत आहे.

आजकाल विरोधकांचे मुख्य शस्त्र म्हणजे भावना आणि अविरोध विरोध. सरकार रस्ता बनवते... हा पर्यावरणावर हल्ला! सरकार झाडं लावते.... ही जमीन बळकावण्याची योजना! सरकार वाय-फाय देतंय... ही गुप्तहेरगिरी सुरू झाली!

विरोध आता मुद्द्यांवर आधारित नसलं तरीही, मुद्दाम केलेला असतो. सरकारचा कुठलाही निर्णय झाला की विरोधक आधी विरोध करतात, मग विचार करतात, नेमकं सरकार केलं तरी काय?

आता तर काही पक्षांनी विरोध प्रशिक्षण केंद्र सुरू केले आहेत. तिथे कार्यकर्त्यांना शिकवलं जातं, सरकारच्या वाक्यांचं विघटन कसं करावं? रस्त्यावर बसण्याचा योग्य कोण कोणता?मीडिया समोर अश्रू कसे ढाळायचे?

एका विरोधी नेत्याने तर स्पष्ट सांगितलं, सरकारच्या कुठल्याही चांगल्या गोष्टीला पाठिंबा दिला, तर जनतेला संशय येईल की आपण खरोखरच विरोधक आहोत का सरकारचे गुप्त सहयोगी! म्हणूनच आता विरोधकांची एकमेव मागणी आहे, सरकारने कोणताही निर्णय आमच्या विरोधाच्या तयारीनंतरच घ्यावा!

■ ■ ■



**डॉ. प्रवीण डबली**
**ज्येष्ठ पत्रकार**
**९४२२१२५६५६**

## वाचक लिहितात

### व्यक्तीस्वातंत्र्याचे धोरण असणे आवश्यक

आतंकवाद्यांचा बुद्धिभेद (ब्रेनवॉश) करणारे त्यांचे पाकिस्तानी मास्टरमाइंड असतात. सुरक्षा यंत्रणा अशांवर चांगलेच लक्ष ठेऊन असतात. हे मास्टरमाइंड जितके दहशतवादी कटाचे गुन्हेगार आहेत तितकेच ती घटना घडल्यानंतर मुळ समस्येला बगल देऊन लोकांना भ्रमित करणारे राजकारणी आणि मिडीया देखिल तितकीच गुन्हेगार आहे असे मला वाटते.

पहलगाम आतंकवादी हल्यानंतर प्रत्यक्षदर्शींनी रोखठोकपणे सांगितले की आमच्या पुरुषांना धर्म विचारून मारण्यात आले. तरी देखील भारतातील अनेक राजकीय व्यक्तिंनी समाजाला भ्रमित करून हा भाग कसा खोटा आहे आणि असे काही घडलेच नाही, दहशतवाद्यांनी स्त्रियांना काही केले नाही मग हे किती चांगले आहे वगैरे सांगून आतंकी विचारांना छुपे अभय प्रदान केले.

मागे सर्जिकल स्ट्राइकचे पुरावे द्या असे सांगून सैनिकांवर ह्याच मंडळींनी अविश्वास दाखवला होता. अशा राजकीय व्यक्तिंना आणि व्यक्तिंच्या पक्षावर याशिवाय लोकांना भ्रमित करणारे बॉलीवुडचे प्रतिष्ठित अभिनेते, कथित समाजसुधारक, लेखक यांना खर म्हणजे वैचारिक दहशतवादी घोषित करून देशद्रोहाचा ठपका ठेवला पाहिजे.

खरच पहलगामच्या दहशतवादी घटनेनंतर माझे डोळे उघडले आणि आता असे वाटू लागले आहे की लोकांच्या दृष्टिने हितकारक अशा विचारसरणीचा संविधानाने स्वीकार केला पाहिजे. अहितकारी दहशतवादी विचारसरणीला संविधानाने संरक्षण देणे आता बंद केले पाहिजे ! कोणत्या विचारांना संरक्षण, प्रसार आणि प्रसिद्धि दिली पाहिजे हे आता भारताने ठरवले पाहिजे. खरच व्यक्तिस्वातंत्र्याचे घटनात्मक नैतिक धोरण (पॉलीसी) ठरवले गेले पाहिजे.

■ **भूषण प्रदीप वाळणुसकर, डोंबिवली.**

# कलिंगड खरेदी करताना या पाच गोष्टी लक्षात ठेवा



उन्हाळा आला की बाजारात कलिंगडांची रेलचेल दिसते. उन्हाच्या झळा थोपवण्यासाठी आणि शरीरातील पाण्याची पातळी टिकवण्यासाठी अनेक जण कलिंगड खाणं पसंत करतात. पण तुम्ही घेत असलेलं कलिंगड खरंच नैसर्गिक आहे का? की रसायनांनी भरलेलं? योग्य माहिती नसेल, तर स्वादासाठी खाल्लेलं कलिंगड आरोग्यावर घातक ठरू शकतं!

**उन्हाळ्यात कलिंगड का खातात?**

उन्हाळ्यात ताजंतवानं राहण्यासाठी कलिंगड हा उत्तम पर्याय आहे. सध्या बाजारात वेगवेगळ्या प्रकारची कलिंगडं दिसत आहेत. पण याचबरोबर काही धोकादायक आजारांचं प्रमाणही वाढतंय, ज्यात कर्करोगाचाही समावेश आहे. काही कलिंगडांमध्ये रसायनांचा वापर केला जातोय. त्यामुळे कलिंगड खरेदी करताना काही गोष्टींकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे, नाहीतर तुमचं संपूर्ण कुटुंब आजारी पडू शकतं.

**बनावट कलिंगड कसे ओळखावे**

कलिंगडाचा गर खूपच लाल आणि चमकदार दिसत असेल, तर ते बनावट असण्याची शक्यता आहे. कापताना त्यातून फेस निघत असेल, तर ते अजिबात खाऊ नका. रसायनयुक्त कलिंगडाची चव थोडी वेगळी आणि काहीशी कृत्रिम वाटू शकते. तसेच, साल खूप चमकदार किंवा अस्वाभाविकरीत्या गुळगुळीत दिसत असेल, तर ते खरेदी करणं टाळा. बाजारात अशा बनावट कलिंगडांमुळे ग्राहकांची फसवणूक होत असल्याच्या तक्रारीही वाढत आहेत.

**अस्सल कलिंगड कसं निवडावं?**

कलिंगड खाण्यापूर्वी ते थंड पाण्यात ३० मिनिटं भिजत ठेवा. खूप लालसर चमकणारं कलिंगड घेऊ नका. बाजारात उघड्यावर कापलेलं कलिंगड खरेदी करणं टाळा, कारण त्यात जिवाणू असण्याची शक्यता असते. घरी कापताना त्यातून फेस किंवा रसायनाचा वास येत नाही ना, याची खात्री करा. हे छोटे उपाय तुम्हाला सुरक्षित ठेवू शकतात.

**कलिंगडामुळे कोणते आजार?**

बाजारातील काही कलिंगडं लवकर पिकावीत म्हणून इथर, कार्बाइड किंवा रंग यांसारख्या रसायनांचा वापर केला जातो. ही रसायनं शरीरात गेल्यास कर्करोग, यकृताचं नुकसान, मूत्रपिंडाच्या समस्या आणि हार्मोनल असंतुलन होऊ शकतं. काही विक्रेते गराला जास्त लाल दाखवण्यासाठी कृत्रिम रंग मिसळतात. हे रंग जर खाद्यप्रमाणित नसतील, तर ते कर्करोगाला आमंत्रण देऊ शकतात. शिवाय, कलिंगड जास्त काळ साठवून ठेवलं किंवा नीट स्टोअर केलं नाही, तर त्यात बुरशी वाढते. ही बुरशी ॲफ्लाटॉक्सिन नावाचं विष तयार करते, ज्यामुळे यकृताचा कर्करोग होण्याचा धोका वाढतो. ■ ■ ■

## अशोकायन

**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**



### भेकड हल्ला..?

शत्रु असता उशाशी
सावध रहावे अष्टोप्रहर
नजर हटी दुर्घटना घटी
अनुभूती येते वरचेवर ..!

शत्रु हा शत्रुच असतो
गणिमी काव्याने करतो चित
त्याला भेकड हल्ला म्हणणे
आहे का बरं यथोचित?

उद्दीष्ट साध्य करण्या
शत्रु असतोच टपून
आपला गाफीलपणाच
त्याला संधी जाते देऊन ..

# सॅमसंग इंडियाकडून 'सॉल्व्ह फॉर टूमारो २०२५' स्पर्धा लाँच



**गुरूग्राम, मुंबई, २ मे :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आपल्या सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो' उपक्रमाच्या चौथ्या एडिशनचे अनावरण केले. ही देशव्यापी स्पर्धा विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा फायदा घेत समाजातील सर्वात प्रचलित आव्हानांचे निराकरण करण्यासाठी नाविन्यपूर्ण सोल्यूशन निर्माण करण्यास प्रेरित करण्याकरिता डिझाइन करण्यात आली आहे.

सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो २०२५' चार विजेल्या टीम्सना १ कोटी रूपये अनुदान देईल, ज्यामुळे त्यांना त्यांच्या प्रकल्पांच्या इन्क्यूबेशनसाठी मदत होईल, तसेच प्रत्यक्ष प्रोटोटाइप्रिंग, गुंतवणूकदार कनेक्ट्स आणि सॅमसंग लीडर्स व आयआयटी दिल्ली फॅकल्टीकडून तज्ञ मार्गदर्शन मिळेल.

या सन्मानामधून स्पर्धेमध्ये निपुण होण्यासोबत त्यापलीकडे जाणारे सोल्यूशन्स अधिक उत्तम करण्याचे महत्त्व दिसून येते, ज्यामुळे ते स्केलेबल व शाश्वत उद्यमांमध्ये विकसित होतील, जे भारतभरातील समुदायांना आकार देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतील.

सॉल्व्ह फॉर टूमारोसह आम्ही भारताच्या कानाकोपऱ्यामधील तरूण इनोव्हेटर्सना मोठे स्वप्न पाहण्यास, वास्तविक विश्वातील आव्हानांचे निराकरण करण्यास आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्मार्टर, अधिक सर्वसमावेशक भविष्य घडवण्यास प्रेरित करत आहोत. यंदा, सॉल्व्ह फॉर टूमारो अधिक मोठे आणि अधिक सर्वसमावेशक असणार आहे. आम्ही अधिकाधिक शहरांपर्यंत पोहोचत आहोत, अधिकाधिक शाळा व कॉलेजमधील विद्यार्थ्यांशी संलग्न होत आहोत आणि त्यांच्यासाठी इनोव्हेट करण्याकरिता मार्ग निर्माण करत आहोत, तसेच डिझाइन थिंकिंगच्या तत्त्वांचा अवलंब करत आहोत. सॉल्व्ह फॉर टूमारोमधून भारत सरकारच्या अग्रगण्य #DigitalIndia उपक्रमाप्रती आमची अविरत कटिबद्धता दिसून येते, जो तरूणांना भावी आर्किटेक्ट्स बनण्यास सक्षम करतो,'' असे सॅमसंग साऊथवेस्ट एशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पार्क म्हणाले.

आयआयटी दिल्लीला तरूणांमध्ये नाविन्यता, उद्योजकता आणि वास्तविक विश्वातील समस्या निवारण क्षमतेला चालना देण्याचा आनंद होत आहे. सॉल्व्ह फॉर टूमारोसोबतचा आमचा सहयोग मार्गदर्शन, संशोधन पायाभूत सुविधा व टेक्निकल मार्गदर्शन देतो, ज्यामुळे तरूणांना त्यांच्या संकल्पनांना उत्पादनांमध्ये रूपांतरित करण्यास मदत होते, ज्यांचा समाजावर मोठा प्रभाव पडतो. आम्हाला या उपक्रमाचा भाग असण्याचा आनंद होत आहे, जो सामाजिकदृष्ट्या जागरूक इनोव्हेशनला सक्षम करतो आणि विकसित भारता'प्रती योगदान देतो,'' असे आयआयटी दिल्लीचे संचालक प्रो. रंगन बॅनर्जी म्हणाले.

भारतातील तरूण इनोव्हेटर्स २०३० पर्यंत सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स साध्य करण्यासाठी आणि २०४७ पर्यंत विकसित भारत हा दृष्टिकोन पूर्ण करण्यासाठी महत्त्वाचे आहेत. इतर देशांच्या तुलनेत आपल्या देशामधील अधिक तरूण विचारवंत सोल्यूशन्स सादर करत असताना भारत संकल्पनांमध्ये अग्रस्थानी असण्यास अद्वितीयरित्या स्थित आहे, जे स्थानिक आव्हानांचे निराकरण करतात आणि जागतिक परिवर्तनाला प्रेरित करतात. सॅमसंगच्या सॉल्व्ह फॉर टूमारो सारखे उपक्रम तरूणांसाठी त्यांच्या संकल्पनांना जागतिक भल्याकरिता सोल्यूशन्समध्ये बदलण्यासाठी, तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वसमावेशक व शाश्वत प्रगतीला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण प्लॅटफॉर्म आहे.

भारतातील यूएनला अशा सहयोगांना विशेषत: खाजगी क्षेत्राला पाठिंबा देण्याचा अभिमान वाटतो, जे तरूण नेतृत्व, इनोव्हेशन व कृतीला चालना देते, ज्यामधून कोणीही मागे न राहण्याची खात्री मिळते,'' असे भारतातील युनायटेड नेशन्स रेसिडण्ट कोऑर्डिनेटर शॉम्बी शार्प म्हणाले.

तरूण व्यक्ती आजच्या नितांत जागतिक आव्हानांचे निराकरण करण्यासाठी महत्त्वाचे आहेत. सॉल्व्ह फॉर टूमारो २०२५ सारखे उपक्रम त्यांना त्यांच्या संकल्पनांना तंत्रज्ञानाचा वापर करत प्रत्यक्षात आणण्यास सक्षम करतात. आम्हाला आनंद होत की, हे सोल्यूशन्स समुदायांमध्ये वास्तविक परिवर्तनाला चालना देण्यासाठी तरूण-केंद्रित संकल्पनांना वाढवण्यास मदत करत आहेत,'' असे इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे (एमईआयटीवाय) अतिरिक्त सचिव अभिषेक सिंग म्हणाले.

मंगळवारी सर्व भागीदारांच्या उपस्थितीत आयआयटी दिल्ली येथे सॉल्व्ह फॉर टूमारो २०२५'चे उद्घाटन करण्यात आले. या उद्घाटनाप्रसंगी भारत सरकारच्या प्रमुख वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाच्या वरिष्ठ संचालक डॉ.सपना पोती, भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सायण्टिस्ट सी शार्दुल राव आणि एमईआयटीवाय स्टार्टअप हबचे सीईओ पी. एस. मदनगोपाळ उपस्थित होते.

## नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची अमरावतीमध्ये यकृत व पचनतंत्र रोगांसाठी विशेष ओपीडी सेवा सुरू



**अमरावती, २ मे :** नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबई यांनी अमरावतीतील विविध ठिकाणी यकृत (लिव्हर) आणि पचनतंत्राशी संबंधित विकारांवर उपचार देणाऱ्या विशेष ओपीडी सेवा सुरू केल्या आहेत. या सेवांचा उद्देश म्हणजे यकृतविकारांनी त्रस्त रुग्णांना स्थानिक पातळीवरच उच्च दर्जाची सल्ला व उपचार सेवा उपलब्ध करून देणे.

हॉस्पिटलचे एचपीबी सर्जरी, लिव्हर व मल्टी ऑर्गन ट्रान्सप्लांट विभागाचे संचालक डॉ. गौरव चौबल हे दर महिन्याच्या चौथ्या रविवारी सकाळी १० ते संध्याकाळी ४ या वेळेत डॉ. अंजली कविमंडन मेमोरियल हॉस्पिटल, दस्तूर नगर आणि रिम्स हॉस्पिटल, बंडेरा रोड, अमरावती येथे उपलब्ध असतील.

डॉ. गौरव चौबल यांनी सांगितले की, लिव्हरचे विकार गंभीर आरोग्य समस्या निर्माण करतात. योग्य वेळी निदान व उपचार न झाल्यास लिव्हर फेल्युअरसारख्या गुंतागुंतीच्या स्थिती उद्भवू शकतात. अमरावतीसारख्या भागांमध्ये उच्च धोका असलेल्या व्यक्तींमध्ये लवकर तपासणी, वेळेवर उपचार व जनजागृती हा आमचा उद्देश आहे.

ते पुढे म्हणाले की, लिव्हर फेल्युअरचे लक्षणं जसे की वारंवार ताप येणे, पिवळसरपणा (पीलिया), गडद रंगाचा मूत्र, फिकट रंगाचा मल, पोट फुगणे, अनावश्यक वजन घट होणे, अती थकवा, सतत उलटी होणे, सहज रक्तस्राव होणे याकडे दुर्लक्ष न करता तात्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा.

ही सेवा नानावटी मॅक्स हॉस्पिटलच्या ग्रामीण व निमशहरी भागांपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचवण्याच्या बांधिलकीचे प्रतीक आहे.

## अर्बन कंपनी लिमिटेडने आयपीओमधून १९०० कोटी रुपयांचे भांडवल उभारण्यासाठी सेबीकडे डीआरएचपी दाखल केले

**नागपूर, २ मे :** अर्बन कंपनी लिमिटेड, घर आणि सौंदर्याशी संबंधित विविध विभागांमध्ये दर्जेदार सेवा आणि उपाययोजनांसाठी उच्च तंत्रज्ञानयुक्त, फुल-स्टॅक ऑनलाईन सेवा मार्केटप्लेस चालवणाऱ्या या कंपनीने बाजार नियामक सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाकडे आपले ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केले आहे. १९000 मिलियन रुपये म्हणजे १९00 कोटी रुपयांपर्यंत आयपीओमार्फत इक्विटी समभागांच्या (दर्शनी मूल्य प्रत्येक समभागासाठी १ रुपया) ऑफरमार्फत फंड्स उभारण्याची कंपनीची योजना आहे.

या कंपनीचे प्रमोटर अभिराज सिंग भाल (चेयरपर्सन, मॅनेजिंग डायरेक्टर आणि चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर), राघव चंद्रा (एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर आणि चीफ टेक्नॉलॉजी अँड प्रॉडक्ट ऑफिसर) आणि वरुण खैतान (एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर आणि चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) हे आहेत.

३१ डिसेंबर २०२४ च्या आकडेवारीनुसार, ही कंपनी भारतभर, संयुक्त अरब अमिरात (युएई), सिंगापूर आणि सौदी अरेबियामध्ये (केएसए) ५९ शहरांमध्ये कार्यरत आहे. यापैकी ४८ शहरे भारतात आहेत. कंपनीच्या प्लॅटफॉर्मवरून ग्राहक खूपच सहजपणे, त्यांना हव्या असलेल्या सेवा ऑर्डर करू शकतात, यामध्ये स्वच्छता, पेस्ट कंट्रोल, इलेक्ट्रिशियन, प्लम्बिंग, सुतारकाम, उपकरणांची सर्व्हिसिंग आणि दुरुस्ती, रंगकाम, स्किनकेयर, हेयर ग्रूमिंग आणि मसाज थेरपी इत्यादींचा समावेश आहे. या ग्राहकांच्या सोयीनुसार, प्रशिक्षित आणि स्वतंत्र सर्व्हिस प्रोफेशनल्स पुरवतात. २०२३ आणि २०२४ आर्थिक वर्षांमध्ये अर्बन कंपनीने 'नेटिव्ह' या ब्रँड नावाने वॉटर प्युरिफायर्स आणि इलेक्ट्रॉनिक डोअर लॉक लॉन्च करून होम सोल्युशन्समध्ये विस्तार केला.

रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसमार्फत प्रस्तुत केले जाणार असलेले इक्विटी समभाग बीएसई लिमिटेड (बीएसई) आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडवर (एनएसई) सूचिबद्ध करण्यासाठी प्रस्तावित आहेत. (लिस्टिंग तपशील) कोटक महिंद्रा कॅपिटल कंपनी, मॉर्गन स्टॅनले इंडिया कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, गोल्डमॅन सॅश (इंडिया) सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड आणि जेएम फायनान्शियल लिमिटेड हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.

## कॅनरा एचएसबीसी लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड तर्फे आयपीओसाठी सेबीकडे डीआरएचपी सादर

**नागपूर, २ मे :** भारतातील जीवन विमा क्षेत्रातील एक अग्रगण्य बँक-प्रणीत खाजगी कंपनी कॅनरा एचएसबीसी लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेडतर्फे प्राथमिक समभाग विक्रीसाठी (आयपीओ) ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) सेबीकडे दाखल करण्यात आला आहे.

कॅनरा बँक आणि एचएसबीसी इनश्युरन्स (आशिया पॅसिफिक) होल्डीग्ज लिमिटेड हे कंपनीचे प्रमोटर्स आहेत.

या आयपीओ मध्ये प्रत्येकी १० रु. दर्शनी मूल्याच्या एकूण २३७,५००,००० पर्यंतचे इक्विटी शेअर्सच्या विक्रीचा प्रस्ताव आहे यामध्ये कॅनरा बँक (प्रवर्तक विक्री समभागधारक) कडून १३७,७५०,००० पर्यंतचे इक्विटी शेअर्स; एचएसबीसी इनश्युरन्स (आशिया पॅसिफिक) होल्डीग्ज लिमिटेड (प्रवर्तक विक्री समभागधारक) यांच्या कडून ४,७५०,००० पर्यंतचे इक्विटी शेअर्स आणि पंजाब नॅशनल बँक (गुंतवणूकदार विक्री समभागधारक) कडून ९५,०००,००० पर्यंतचे इक्विटी शेअर्स समाविष्ट आहेत.

कॅनरा एचएसबीसी लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड ही भारतातील एक खाजगी जीवन विमा कंपनी आहे आणि ती कॅनरा बँक (३१ डिसेंबर २०२४ रोजी पर्यंत एकूण मालमत्तेच्या आधारावर भारतातील चौथी सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील बँक आहे स्रोत: CRISILअहवाल) आणि एचएसबीसी इनश्युरन्स (आशिया पॅसिफिक) होल्डीग्ज लिमिटेड (ही द हाँगकाँग अँड शांघाय बँकिंग कॉर्पोरेशन लिमिटेड समूहाचा एक भाग आहे) यांच्यामार्फत प्रवर्तित आहे. एचएसबीसीची जागतिक वित्तीय संस्था म्हणून असलेली प्रतिष्ठा कंपनीसाठी विश्वासार्हता आणि ब्रँड मूल्य वाढवते. ३१ मार्च २०२४ पर्यंत, कंपनी सार्वजनिक क्षेत्रातील प्रवर्तक असलेल्या जीवन विमा कंपन्यांमध्ये तिसऱ्या क्रमांकाची सर्वाधिक व्यवस्थापनांतर्गत मालमत्ता होती (स्रोत: CRISIL अहवाल) आणि आर्थिक वर्ष २०२४ मध्ये जीवन संरक्षण प्रमाण या आधारे भारतातील अग्रणी पाच बँक-प्रेरित जीवन विमा कंपन्यांमध्ये तिचा समावेश आहे (स्रोत: CRISIL अहवाल).

एसबीआय कॅपिटल मार्केट्स लिमिटेड, बीएनपी परिबास, एचएसबीसी सिक्युरिटीज अँड कॅपिटल मार्केट्स (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, जेएम फायनान्शियल लिमिटेड आणि मोतीलाल ओसवाल इन्व्हेस्टमेंट ॲडव्हायझर्स लिमिटेड हे या इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.

## सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत बापोद्रा चाळ नष्ट होण्यापासून वाचवण्यासाठी जुगल कादंबरीशी लग्न करणार?



**मुंबई, २ मे :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिका पुष्पा (करुणा पांडे) या कधीही हार न मानणाऱ्या स्त्रीचा प्रेरणादायक प्रवास सादर करून प्रेक्षकांची आवडती मालिका बनली आहे. या मालिकेत तिचा प्रवास सुंदर रीतीने दाखवला आहे. आयुष्यातील सगळ्या आव्हानांचा ती ताकदीने, चिकाटीने आणि सकारात्मकतेने सामना करते. अलीकडच्या भागांमध्ये, अर्जुन (तन्मय नागर) गुपचुप आपल्या वडीलांच्या ऑफिसात शिरतो आणि तिकडे त्याला एक महत्त्वाची फाइल मिळते, ज्यामध्ये एक मोठे सत्य लपवलेले असते. तथाकथित मसाला फॅक्टरी हे खरं तर एक जोरात चालणारे उत्पादन युनिट असते. हा महत्त्वाचा पुरावा कोर्टातील केस त्यांच्या बाजूने फिरवू शकतो आणि चाळ नष्ट होण्यापासून वाचवू शकतो. ही आशा दिसत असतानाच नको त्या वेळी कादंबरी (वृंदा त्रिवेदी)ची पुन्हा एंट्री होते. आणखी एक धक्का मिळतो. ती फाइल्सची अदलाबदली करते आणि एक भयंकर अल्टीमेटम देते आणि सगळे काही उलटवून टाकण्याची धमकी देते.

आगामी भागांमध्ये कादंबरी एक भयंकर अल्टीमेटम देते. जुगलने (अंशुल त्रिवेदी) आपल्याशी लग्न करण्यास होकार दिला, तरच आपण चाळ नष्ट होण्यापासून वाचवणारी मूळ फाइल देऊ असे ती सांगते. अनेक चाळकऱ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे त्यामुळे जुगल कोंडीत सापडला आहे. पण अशा वेळी पुष्पा शांत बसणाऱ्यांतली नाही. आपले लग्न थांबवून दाखवावे अशी धमकी कादंबरी पुष्पाला देते. दुसरीकडे इतके मोठे बलिदान देऊन तिच्याशी लग्न करण्यापासून आपल्या मित्राला वाचवले पाहिजे असे पुष्पाच्या मनात आहे. दरम्यान, शंभू शेखावत (सुकेश आनंद) चवताळला आहे, कारण चाळीचे मसाला फॅक्टरीमध्ये रूपांतर करण्याची त्याने बारकाईने बनवलेली योजना आता अडचणीत आली आहे. पुष्पा कादंबरी आणि जुगलचे लग्न थांबवू शकेल का आणि चाळ देखील वाचवू शकेल का?

या मालिकेत पुष्पाची भूमिका करणारी करुणा पांडे म्हणते, मी लहानपणापासून माझ्या आईमध्ये हे पाहिले आहे की आपल्या आत्मबळावर आणि निर्धाराच्या जोरावर आपल्या माणसांचे रक्षण करण्यासाठी ती काय काय करायची. पुष्पाच्या व्यक्तिरेखेत मी हीच भावना आणण्याचा प्रयत्न केला आहे. जे खरे आहे त्याच्यासाठी लढत राहण्याचा निर्धार! मग साध्य कितीही अशक्य वाटो! पुष्पाला आत्ता आपली चाळ वाचवायची आहे आणि त्याच बरोबर आपल्या मित्राला संकटात टाकायचे नाही आहे. चाळीसाठी जुगल आपल्या आयुष्याचे बलिदान देईल ही कल्पना तिला सहन होत नाही, आणि ती आतून कोसळते. ती एक असे युद्ध लढत आहे, ज्यात कोणतीच निवड करणे तिला योग्य वाटत नाही. पण पुष्पा हार मानणार नाही. चाळीच्या बाबतीत नाही किंवा आपल्या मित्राच्या बाबतीतही ती माघार घेणार नाही. दोघांचे रक्षण करण्यासाठी ती काहीही करायला सिद्ध आहे.

## हारपिकने शाहरुख खानला नियुक्त केले आपला ब्रँड ॲम्बेसेडर

**मुंबई, २ मे :** भारतातील क्रमांक १ शौचालय व बाथरूम क्लिनर आणि १० कोटींपेक्षा अधिक कुटुंबांचा विश्वास संपादन करणाऱ्या गृहस्वच्छतेच्या अग्रगण्य ब्रँड हारपिकने आज आपल्या यशस्वी प्रवासातील एक ऐतिहासिक क्षण जाहीर केला आहे, बॉलीवूडचा बादशहा शाहरुख खान आता हारपिकचा ब्रँड ॲम्बेसेडर असेल. ही विशेष भागीदारी हारपिकनेच्या उत्कृष्ट स्वच्छतेच्या परंपरेला शाहरुख खानच्या लोकप्रियतेशी, मूल्यांशी आणि भारतीय कुटुंबांवरील प्रभावाशी जोडते.

ब्रँडसोबतच्या आपल्या नात्याबद्दल बोलताना शाहरुख खान म्हणाले, स्वच्छता ही लहान पण महत्त्वपूर्ण कृतींनी सुरू होते. हारपिकसारख्या ब्रँडसोबत भागीदारी करताना मला आनंद आणि अभिमान वाटतो, ज्याने अनेक वर्षांपासून भारतीय घरांमध्ये स्वच्छता आणि सन्मान यासाठी सतत काम केले आहे. मी त्या सर्व गृहिणींना या घरांच्या खऱ्या नायकांना मनापासून सलाम करतो, ज्या आपल्या कुटुंबाच्या आरोग्य आणि आनंदासाठी निःस्वार्थपणे मेहनत घेतात. त्या उत्तमतेस पात्र आहेत. हारपिक है नामुळे आता प्रत्येक घराला अवघ्या पाच मिनिटांत उत्कृष्ट स्वच्छता, प्रभावी क्लिनिंग आणि दीर्घकाळ टिकणारा ताजेपणा मिळू शकेल. जसं जीवनात काही क्षणांना विश्वासार्ह आधाराची गरज असते, तसं हारपिक है ना हे प्रत्येक घरासाठी एक विश्वासार्ह साथीदार ठरतं.

ब्रँडसोबतच्या आपल्या नात्याबद्दल बोलताना शाहरुख खान म्हणाले, स्वच्छता ही लहान पण महत्त्वपूर्ण कृतींनी सुरू होते. हारपिकसारख्या ब्रँडसोबत भागीदारी करताना मला आनंद आणि अभिमान वाटतो, ज्याने अनेक वर्षांपासून भारतीय घरांमध्ये स्वच्छता आणि सन्मान यासाठी सतत काम केले आहे. मी त्या सर्व गृहिणींना या घरांच्या खऱ्या नायकांना मनापासून सलाम करतो, ज्या आपल्या कुटुंबाच्या आरोग्य आणि आनंदासाठी निःस्वार्थपणे मेहनत घेतात. त्या उत्तमतेस पात्र आहेत. हारपिक है नामुळे आता प्रत्येक घराला अवघ्या पाच मिनिटांत उत्कृष्ट स्वच्छता, प्रभावी क्लिनिंग आणि दीर्घकाळ टिकणारा ताजेपणा मिळू शकेल. जसं जीवनात काही क्षणांना विश्वासार्ह आधाराची गरज असते, तसं हारपिक है ना हे प्रत्येक घरासाठी एक विश्वासार्ह साथीदार ठरतं.

या ऐतिहासिक भागीदारीच्या प्रारंभाच्या निमित्ताने, हारपिक शाहरुख खानसोबतचा नवीन टीव्हीसी हारपिक है ना लाँच करणार आहे, ज्यामध्ये हारपिक टॉयलेट क्लिनरची उत्कृष्टता दाखवली जाईल. या टीव्हीसीद्वारे १० पट अधिक स्वच्छता, ५ मिनिटांत शक्तिशाली निर्जंतुकीकरण आणि दीर्घकाळ टिकणारा सुगंध यांचे वचन दिले जाते. ही मोहीम हारपिकच्या स्थानाला मजबूत करते, जे फक्त डिटर्जंट्सच्या तुलनेत चांगला पर्याय नाही, तर संपूर्ण शौचालय स्वच्छतेसाठी सर्वोत्तम उपाय आहे.

या घोषणेवर प्रतिक्रिया देताना, हायजिन, रेकिट दक्षिण आशियाचे मार्केटिंग डायरेक्टर गौतम ऋषि म्हणाले, शाहरुख खानला हारपिक कुटुंबात सामील करताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. त्याचा भारतातील लाखो लोकांसोबतचा सखोल संबंध आणि त्याची मूल्ये हारपिच्या विश्वास, कार्यक्षमता आणि काळजीच्या प्रवासाशी पूर्णपणे जुळतात. विज्ञानावर आधारित नवकल्पना आणि उत्कृष्ट स्वच्छता उपायांच्या वचनबद्धतेच्या बाबतीत हारपिकचा वारसा भारतातील स्वच्छता सवयींमध्ये मोठे बदल घडवून आणत आहे. गेल्या २० वर्षांत आम्ही देशभरातील १/३ कुटुंबांचा विश्वास जिंकला आहे, आणि आता आमचा उद्देश तो प्रत्येक दुसऱ्या घरात पोहोचवण्याचा आहे. उत्कृष्ट हारपिक उत्पादन आणि ही अद्वितीय भागीदारी यामुळे, आम्ही समर्पित शौचालय स्वच्छतेच्या उपायांचे महत्त्व दृढ करण्याचे आणि हारपिकला भारतीय कुटुंबांचा अविभाज्य भाग बनवण्याचे लक्ष्य ठरवले आहे.

हावस इंडियाच्या जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर आणि चीफ क्रिएटिव्ह ऑफिसर अनुपमा रामस्वामी म्हणाल्या, जेव्हा हारपिक, जो मार्केटमध्ये लीडर आहे, आपल्याला त्याच्या आधीच सर्वोच्च स्थानावरून पुढे नेण्यास सांगतो, तेव्हा हावस क्रिएटिव्ह काय करते? आम्ही मोठं विचार करत नाही, तर 'किंग साईझ' विचारतो. आम्ही सुचवले की किंग खानला आपल्या मोहिमेत सामील करावे! आम्ही एक अशी मोहिम तयार केली आहे, जिथे शाहरुख खान प्रत्येक गृहिणीचा साथीदार बनतो आणि हारपिकच्या उत्कृष्टतेमुळे तिचं जीवन सोपं करतं. आणि त्याच्या खास शैलीत, तो मोहकपणे म्हणतो हारपिक है ना!

ही भागीदारी हरपिकच्या प्रवासातील एक धाडसी नवीन अध्याय सुरू करते त्याच्या विश्वासार्ह वारशाला आधुनिक काळातील महत्त्वासोबत मिळवून, भारतीय कुटुंबांना अधिक प्रभावी स्वच्छता उपाय निवडण्यासाठी प्रेरित करते.

## आज का अंदाज

**शनिवार ३ मे २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ५ | ८ | २ | ५ | ६ | ७ |
| ३८० | १४९ | ४४७ | २८८ | ११० | २३० | १६९ | ८९० |
| ४७० | २४८ | ३६६ | ४६८ | २०० | ३५७ | २६८ | २५, |
| ५६० | ३४७ | २६७ | ३५० | ३९० | ७८० | ३६७ | १६० |
| १० | ४० | ५३ | ८३ | २४ | ५४ | ६१ | ७१ |
| १९ | ४९ | ५२ | ८२ | २० | ५० | ६८ | ७८ |
| १७ | ४७ | ५६ | ८६ | २९ | ५९ | ६३ | ७३ |

**३ मे : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ३१ | ६० | ९० |
| २५ | ३५ | ६७ | ९७ |
| २८ | ३८ | ६४ | ९४ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## विपिन हीरो: मालिका भाबीजी घर पर है'चे कलाकार मला मल्खानच्या भूमिकेत पाहून भावूक झाले!

मालिकेमध्ये मल्खानची भूमिका साकारताना आव्हानात्मक वाटले का?

मल्खानची भूमिका सोपी नाही, तो वारसा पुढे घेऊन जातो. पण माझ्या सह-कलाकारांच्या अविश्वसनीय पाठिंब्यामुळे हा प्रवास सोपा ठरत आहे. सर्वजण माझ्याशी आपुलकीने व संयमाने वागत आहेत, मला मल्खान बोलणाऱ्या त्याच्या पंचलाइन्सपासून त्याच्या खोडकर देहबोलीपर्यंत प्रत्येक बारकावे समजण्यास मदत करत आहेत. येथे सर्वजण कुटुंबासारखे वाटतात आणि त्यांच्या प्रोत्साहनाने मला भूमिकेमध्ये सामावून जाण्यास, तसेच भूमिकेमधील भावनिक महत्त्वाचा आदर करण्यास आत्मविश्वास दिला आहे.

या भूमिकेमध्ये सामावून जाताना कसे वाटले?

मल्खान सिंगची भूमिका साकारणे माझ्यासाठी संधीपेक्षा भावना आहे. दीपेशने या भूमिकेसाठी बेंचमार्क निर्माण केला आणि त्याने साकारलेली भूमिका साकारण्याची संधी मिळणे नियतीमध्ये लिहिलेले होते असे वाटते, ज्यामुळे आमच्यामध्ये एक खास भावनिक नाते निर्माण झाले आहे. पहिल्याच दिवशी मी सेटवर मल्खानच्या पेहरावामध्ये आलो आणि सर्वत्र शांतता पसरली होती. मला भूमिकेबाबतच्या आठवणी जाणवू लागल्या. वैभव माथूर (टिका), सलिम झैदी (टिल्लू), रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी) आणि सोमा राठोड जी (अम्माजी) हे सर्व स्तब्ध झाले आणि त्यांच्या डोळ्यांमध्ये भावना दिसून आली. त्यांनी मला सांगितले की मी त्यांना माझ्या लुकमधून, तसेच ऊर्जा व उत्साहामधून त्याची आठवण करून दिली. तो क्षण उत्साहवर्धक व विनम्र होता.

कलाकारांमध्ये सामील होण्यापूर्वी तुम्ही मालिका भाबीजी घर पर है'शी किती वैयक्तिकरित्या संलग्न आहात?

माझे कुटुंब आणि मी अनेक वर्षांपासून मालिका भाबीजी घर पर है'चे मोठे चाहते आहोत. आम्ही घरी दररोज मालिका पाहायचो, कधीच एकही एपिसोड पाहायला चुकलो नाही. म्हणून या मालिकेचा भाग बनणे स्वप्न पूर्ण झाल्यासारखे वाटते. व्यावसायिक स्तरावर हे यश असण्यासोबत माझ्यासाठी व माझ्या प्रियजनांसाठी अभिमानास्पद क्षण देखील आहे. सेटवर आल्यानंतर मला कृतज्ञता व जबाबदारी जाणवते.

तुम्ही गायक व लेखक देखील आहात. ही क्रिएटिव्ह पार्श्वभूमी तुम्हाला अभिनय प्रवासामध्ये कशाप्रकारे मदत करते?

संगीत, लेखन व अभिनय हे सर्व भावनांच्या अभिव्यक्ती आहेत. गायन व गीतरचनेमध्ये पार्श्वभूमी असल्याने मला भावना जाणून घेण्यास आणि वास्तविक रूपात अभिव्यक्त करण्यास मदत होते. यामुळे मला ताल व टाइमिंग साध्य करता येते, विशेषत: कॉमेडीमध्ये, जेथे बीट्स व पॉजेज खूप महत्त्वाचे आहेत. माझा विश्वास आहे की प्रत्येक कलाप्रकार एकमेकांशी जुडलेले आहेत, ज्यामधून तुम्ही सर्वोत्तम परफॉर्मर बनता.

कॉमडी सीन्स तुमचा कम्फर्ट झोन आहे असे वाटते. ते तुमच्या मनाशी इतके का जवळ आहेत याबाबत सांगू शकता का?

माझ्यासाठी कॉमेडी म्हणजे श्वास. यामध्ये मला उत्साही आणि प्रेक्षकांशी कनेक्टेड असल्यासारखे वाटते. व्यक्तींना हसवणे हा मोठा आशीर्वाद आहे आणि यामधून मला खूप समाधान मिळते. विशेषत: भाबीजी घर पर है' सारखी मालिका घराघरामध्ये आनंद पसरवत आहे.

## सोनी सबवरील वीर हनुमान मालिकेत हनुमानाच्या जीवनात शनिदेवाचा प्रवेश, आता पुढे काय होणार?

**मुंबई, २ मे :** सोनी सबवरील वीर हनुमान मालिका छोट्या, कुतुहलाने भरलेल्या मारुतीचे दिव्य, महावीर हनुमानात रूपांतर होण्याची रोचक आणि हृदयस्पर्शी कहाणी सादर करून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. या मालिकेत आन तिवारीने बाल हनुमानाची भूमिका केली आहे, आरव चौधरी केसरीच्या, सायली साळुंखे अंजनीच्या तर माहिर पांधी वाली आणि सुग्रीव अशा दुहेरी भूमिका करत आहेत. वीर हनुमान सर्व वयोगटातील प्रेक्षकांना आवडेल अशी मालिका आहे. अलीकडच्या भागांमध्ये, मारुती पाताळ काली (ऐश्वर्या भकुनी) पुढे अशी प्रतिज्ञा करतो की, तो सूर्योदय होऊ देणार नाही. इकडे केसरी राज माता अंजनीच्या रक्षणासाठी भगवान शंकराची आराधना करतो. आपल्या महिमा सिद्धीचा उपयोग करून मारुती सूर्यकिरणांना पृथ्वीवर येण्यापासून रोखतो.

आगामी भागांमध्ये, शनिदेव (ऋषभ पवार) हनुमनाच्या आयुष्यात प्रवेश करणार आहे, जो हनुमानाच्या जीवनातील टर्निंग पॉइंट असेल. दैवी संकेत आणि जटायू (भीमराज मालाजी) च्या सुजाण मार्गदर्शनाखाली हनुमान आपल्या आराध्य देवतेचा परिचय जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहे. भगवान महादेव (तरुण खन्ना) त्याला योग्य दिशा देण्यासाठी शनिदेवाला पाठवतात. हनुमान पाच आध्यात्मिक पातळ्या पार करण्याची तयारी करत असताना शनिदेवाची छाया किष्किंधा नगरीवर पडते आणि अनपेक्षित संकटे येऊ लागतात. वाली हनुमानाला मात देण्याची योजना आखत आहे आणि राज्यसत्तेत परिवर्तन येऊ घातले आहे. त्यामुळे पुढील वाट आव्हानांनी भरलेली आहे. आणि हनुमानाची श्रद्धा, ताकद आणि नियती यांची कसोटी लागणार आहे.

हनुमान या सावटाच्या बाहेर येऊन आपल्या दिव्य भागयास अनुसरेल का? ही दिव्य गाथा बघण्यासाठी मालिका आवर्जून बघा!

## जमाई नं.१ च्या एका महत्त्वपूर्ण दृश्यासाठी सिमरन कौरने ऑटोरिक्षा चालवायला शिकली



**मुंबई, २ मे :** झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका जमाई नं.१ मधील एका महत्त्वाच्या भागासाठी प्रेक्षकांना भावनांनी भरलेली दृश्ये पाहायला मिळणार आहेत, कारण रिद्धीच्या भूमिकेतील सिमरन कौर एका हिरॉईक क्टमध्ये दिसून येईल आणि तिला पाहून प्रेक्षक थक्क होतील. नाट्यमय घडामोडींमध्ये रिद्धी जीवनमरणाच्या प्रसंगात सापडेल कारण तिच्या वडिलांना हृदयविकाराचा झटका येईल. आजूबाजूला मदत करायला कोणीच नसताना तिला अचानक जवळ एक ऑटोरिक्षा दिसते आणि मग ती क्षणात तिच्या ड्रायव्हरच्या सीटवर बसते आणि त्यांना इस्पितळात घेऊन जाते. यातून तिचे तिच्या परिवारावरील अढळ प्रेम, तिची ताकद आणि निर्धार दिसून येतो.

हे दृश्य साकारण्याचा अनुभव सिमरनसाठी विशेष आणि आव्हानात्मक होता. पण खरेपणासाठी आपल्या निर्धारासाठी ती मानली जाते आणि कुठल्याही बॉडी डबलच्या वापराशिवाय हे दृश्य स्वतः करण्याचे तिने ठरवले. ह्याआधी तिने कधी ऑटोरिक्षा चालवली नव्हती, तरीही तिने हे आव्हान स्वीकारले. प्रॉडक्शन टीमच्या मदतीने तिने पटकन बेसिक गोष्टी शिकल्या आणि मोठ्या तणावाखाली यशस्वीपणे हे दृश्य साकारले.

आपल्या अनुभवाबद्दल सिमरन म्हणाली, मी सेटवर केलेल्या अगदी वेगळ्या गोष्टींपैकी ही एक आहे. मी ह्याआधी कधीही ऑटो चालवली नव्हती, त्यामुळे हे माझ्यासाठी अगदी नवीन होते. मी टेकच्या अगदी एक तास आधी ऑटोरिक्षा चालवायला शिकवली आणि अर्थात त्यामुळे अख्ख्या दृश्याला एक प्रकारचा खरेपणा लाभला. हे दृश्य साकारताना मी अतिशय रोमांचित होते. आम्ही योग्य त्या सुरक्षा उपाययोजना केल्या होत्या. टीमने मला छान पाठिंबा दिला. त्यांनी सहनशक्ती राखली आणि पूर्णपणे मला समर्थन दिले. असे काहीतरी आऊट ऑफ दि बॉक्स करणे ताजतवाने करणारे होते आणि माझ्या व्यक्तिरेखेची ही बाजू सर्वांनी पाहावी यासाठी मी खरंच खूप उत्सुक आहे.

ह्या दृश्याच्या माध्यमातून आपल्याला अगदी नवीन काहीतरी शिकायला मिळाले याबद्दल सिमरन अतिशय उत्साहात असून खरे नाट्य तर आता सुरूच होत आहे. जसजसे हे नाट्य उलगडत जाईल, तसतसे प्रेक्षकांना नील अभिषेक मलिक आणि रिद्धी यांच्या आयुष्यात भावनांचा कल्लोळ, नवनवीन गोष्टींचा उलगडा आणि नाट्यमय वळणे पाहायला मिळतील.

## राशीभविष्य

**मेष :** प्रेमसंबंधांमध्ये प्रेम आणि भावनांना स्थान असते, परंतु पैसा महत्त्वाचा राहील. तुम्ही तुमचे मन इकडून तिकडे भटकू देऊ नका, ते तुमच्या कौटुंबिक जीवनावर केंद्रित करावे.

**वृषभ :** आज तुम्हाला काही अप्रिय बातमी मिळू शकते. काही महत्त्वाच्या कामात विलंब झाल्यामुळे मन दु:खी राहील. कामाच्या ठिकाणी अशी कोणतीही घटना घडू शकते ज्यामुळे अपमान सहन करावा लागू शकतो.

**मिथुन :** तुम्हाला सरकारी सत्तेचा लाभ मिळेल. विद्यार्थ्यांना अभ्यासाशी संबंधित काही समस्या येत राहतील. ज्यामुळे भरपूर संपत्ती मिळेल. नोकरीत अधीनस्थांना फायदा होईल.

**कर्क :** आज तुम्हाला तुमच्या सासरच्या लोकांकडून काही चांगली बातमी मिळेल. मनोरंजनात्मक सामग्री तयार करणाजया लोकांना प्रगतीसोबत यशही मिळेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला नवीन मित्र मिळतील.

**सिंह :** तुम्ही जिथे प्रयत्न कराल तिथे तुम्हाला उत्पन्न मिळेल. मजूर म्हणून काम करून आपला उदरनिर्वाह करणाजया लोकांना विशेष यश आणि संपत्ती मिळेल. व्यसनापासून दूर राहण्याचा प्रयत्न करा.

**कन्या :** आज प्रेमसंबंधांमध्ये एकमेकांच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागेल. अन्यथा, थोडासा निष्काळजीपणा धोकादायक ठरेल. आहार आणि प्रकृतीकडे विशेष लक्ष पुरवा.

**तुळ :** आज तुम्हाला राजकारणात महत्त्वाच्या जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना दूरच्या देशातून चांगली बातमी मिळेल.

**वृश्चिक :** आज तुमचे आरोग्य कमकुवत राहील. बराच काळापासून असलेला कोणताही आजार बरा होईल. रक्त विकारांबाबत अधिक सतर्क आणि काळजी घ्या. अन्यथा अडचणींना सामोरे जावे लागू शकते.

**धनु :** आज मुलांच्या खेळण्यांच्या व्यवसायात गुंतलेल्या लोकांना विशेष लाभ मिळतील. तुमच्या भावना कोणासमोरही व्यक्त करू नका. नाहीतर लोक तुमच्या भावनिकतेची थट्टा करतील.

**मकर :** जमीन, इमारत, वाहन इत्यादी खरेदी करण्याच्या नियोजनासाठी, बचत केलेले भांडवल खर्च करण्यासोबतच, तुम्हाला कर्ज देखील घ्यावे लागू शकते. व्यवसाय क्षेत्रात जास्त काम असेल.

**कुंभ :** ट्रॅव्हल एजन्सी आणि वाहतूक विभागाशी संबंधित लोकांना यश आणि पैसा मिळेल. सासरच्या लोकांकडून शुभ कार्यक्रमाचे आमंत्रण मिळू शकते. कुटुंबात अनावश्यक वाद होऊ शकतात.

**मीन :** आज प्रेमसंबंधांमध्ये जवळीकता येईल. तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी सहलीला जाऊ शकता. वैवाहिक जीवनात पती-पत्नीमधील प्रेम आणि आकर्षण वाढेल.

## वागले की दुनिया मालिकेत राजेश वागले दिसणार वेंकट स्वामी राजूच्या रूपात!



**मुंबई, २ मे :** सोनी सबवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिका त्यातील संबद्ध वाटणारा मध्यमवर्गीय संघर्ष आणि हृदयस्पर्शी कौटुंबिक क्षण यामुळे लोकांची आवडती मालिका झाली आहे.

अलीकडच्या भागांमध्ये, कियारा (अंजू जाधव) आपल्या ड्रीम मॅनचे सर्जन करण्यासाठी एआय ॲप च्या मदतीने प्रयत्न करते. जेव्हा ते ॲप राजेश वागलेचा (सुमित राघवन) चेहरा जनरेट करते, तेव्हा तिला धक्काच बसतो. ती शांतपणे ती इमेज सेव्ह करून ठेवते आणि राजेशला नकळत ती दिसते आणि त्याच्या मनात संदेह आणि भीती येते. मग काही गंमतीशीर गोष्टी घडतात.

कियाराला कामकाजाच्या वेळेत राजेश अचानक एका कॅफेमध्ये दिसतो. आपण पाहिलेला हा माणूस राजेश सारखाच दिसणारा एक तामिळ वेंकट स्वामी राजू होता अशी ती बतावणी करते.

आगामी भागांमध्ये, दक्कू (दीपक पारीक) राजेशला बेमालूम लकबी आणि उत्तम वेषभूशेसह तोतया वेंकटचे रूप घेण्यास मदत करतो. पण कियारा वंदनाला (परिवा प्रणती) विश्वासात घेऊन सगळे सांगते, तेव्हा आणखीनच गोंधळ माजतो. ती वंदनाला सांगते की, ती पूर्वी राजेशला आपला आदर्श जोडीदार मानत असे, पण आता तिला वाटते काहे की वेंकट तिचा खरा जोडीदार आहे. सत्य माहीत नसल्यामुळे ती वेंकटला मागणी घालण्याचे देखील ठरवते. जेव्हा वंदना या रहस्यमय तोतयाला बघण्याची इच्छा व्यक्त करते आणि त्याला वागले कुटुंबाला भेटण्यासाठी आपल्या घरी बोलावते, तेव्हा गुंता आणखीनच वाढतो.

हा गुंता राजेश कसा सोडवेल? तो एकाच वेळी राजेश आणि राजू बनू शकेल का? कारण दोघांनी एका वेळेस हजर राहणे अपेक्षित आहे.

आगामी भागांमध्ये भरपूर धमाल, भन्नाट घटनाक्रम, ओळखीतील गफलत, गोंधळ आणि थेट वागले-शैलीचा विनोद बघायला मिळेल.

राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, खरं सांगतो, हे वेंकट स्वामी राजू कथानक भलतेच धमाल होते! कल्पना करा, एरवी अगदी नीटनेटका, व्यवस्थित असलेला राजेश तामिळ असल्याचे नाटक करत आहे. अनेक लोकांना हे माहीत नसेल पण मी प्रत्यक्ष जीवनात तमिळच आहे. त्यामुळे वेंकट स्वामी राजूच्या भूमिकेत शिरणे माझ्यासाठी सोपे, जुन्या आठवणींचा आनंद देणारे आणि रंजक होते. राजेश हा खोटेपणा टिकवून ठेवण्याचा आटापिटा करत आहे, पण इतर सगळ्या गोष्टी हाताबाहेर गेल्या आहेत. थोडक्यात एक भन्नाट वागले गोंधळ माजणार आहे. आणि मला वाटते, ही गोष्ट उलगडताना बघताना प्रेक्षकांना आणि खास करून कुटुंबांना खूप मजा येईल.

# नुकसानग्रस्त भागाची आ. बडोले यांनी केली पाहणी

**सडक अर्जुनी :** सडक अर्जुनी तालुक्यातील राका, चिखली, मनेरी, कोकणा व खोबा या गावांमध्ये अवकाळी पाऊस व वादळामुळे धान पिके व राहत्या घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त भागाची पाहणी आज २८ एप्रिल रोजी आमदार तथा माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी केली. पाहणी दरम्यान आमदार राजकुमार बडोले यांनी शेतकरी व नागरिकांशी संवाद साधून, नुकसानग्रस्त पिके व घरे यांचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश तहसील प्रशासन व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. तसेच शासनाकडून लवकरात लवकर आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. अवकाळी पाऊस आणि जोरदार वादळामुळे तालुक्यात शेतकरी व नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, अनेक शेतकरी संकटात सापडले आहेत. सर्वांच्या सहकार्याने तातडीने पंचनामे पूर्ण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासन स्तरावर अहवाल सादर केला जाणार आहे. शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणार असल्याचेही आमदार राजकुमार बडोलेनी सांगितले. या पाहणी दौऱ्यात जिल्हा परिषद सदस्या कविता रंगारी, पंचायत समितीचे माजी उपसभापती शालिंदर कापगते, पंचायत समिती सदस्य शिवाजी गहाणे, पंचायत समिती सदस्या सपना नाईक, किशोर बावनकर, ईश्वर कोरे, प्रल्हाद वरठे, ग्रामपंचायत राका उपसरपंच मधुसूदन दोनोडे, चिखली सरपंच चित्रा भेंडारकर, कनेरी ग्रामपंचायत सरपंच ज्योती पाऊलझगडे, कोकणा ग्रामपंचायत सरपंच अमर रोकडे, मधुकर मेंढे आदी पदाधिकारी व ग्रामस्थ, शेतकरी उपस्थित होते.

# १४ वर्षांपासून सर्वशिक्षाचे कर्मचारी एकाच ठिकाणी

## शासनाच्या आदेशानंतरही प्रशासनाची चालढकल

**प्रतिनिधी / गोंदिया**

जिल्हा परिषद सर्व/समग्र शिक्षा अभियानात तालुकास्तरावर व डायट अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्याही प्रशासकीय बदल्या करण्याबाबत जिल्हा परिषदने २०१९ ला मार्गदर्शन मागितले होते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद (मुंबई) कडून स्पष्ट निर्देश प्राप्त झाले होते की जिल्हांतर्गत प्रशासकीय बदल्या शक्यतो एप्रिल व मे महिन्यात करावे व ते संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाच आहेत. परंतु मार्गदर्शन पत्राला जिल्हा परिषदेने केराची टोपली दाखवत राजकीय दबावाखाली या कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या नाहीत.

दरवर्षी देवरी, सालेकसा, आमगाव, अर्जुनी मोरगाव, सडक अर्जुनी या तालुक्यात कार्यरत कर्मचारी जिल्हा परिषदेला बदली बाबत निवेदन देतात. परंतु गोंदिया, गोरेगाव, तिरोडा या साधारण क्षेत्रात कार्यरत कर्मचारी स्थानिक राजकीय नेते मंडळींकडे जाऊन जिल्हा परिषदेवर बदल्या न करण्याबाबत दबाव आणतात त्यामुळे मागील चार वर्षांपासून जिल्हानंतर्गत बदल्या थांबल्या आहेत. मागील वर्षी बदल्या करण्याबाबत जिल्हा परिषदेने कार्यवाही करण्यास डायट कडे - पत्र व्यवहार केला होता परंतु ज्या कर्मचाऱ्यांना बदल्याच नकोत त्यांनी प्राचार्यांना निवेदन सादर करून कार्यवाही न करण्यास भाग पाडले. त्यामुळे - डायटकडून बदल्यांबाबत कार्यवाही करण्यात आली नाही.

सप्टेंबर २०१९ मध्ये करण्यात आल्या काही निवडक बदल्या - माहे सप्टेंबर २०१९ च्या आदेशात काही निवडक लोकांच्या विनंतीवरून बदल्या करण्यात आल्या. त्या



कशा झाल्यात? आपसी बदली होऊन आलेल्या कर्मचाऱ्यांना डावलून दुसऱ्यालाच त्यांच्याजागी देण्यात आले. जिल्हाअंतर्गत प्रशासकीय व विनंती बदल्या या एप्रिल व मे महिन्यातच होत असतात. तर या लोकांच्या बदल्या सप्टेंबरमध्ये सत्राच्या मधात का करण्यात आल्या? बदल्या करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांची कार्यशाळा का घेण्यात आली नाही? असे अनेक प्रश्न कर्मचाऱ्यांना पडले आहेत

# पालक-शिक्षक संघाच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा



**गोंदिया :** येथील गोंदिया पब्लिक स्कूलच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी कार्यकारी पालक शिक्षक संघ समितीची बैठक घेण्यात आली.

बैठकीत समिती अध्यक्ष प्राचार्य तुषार येरपुडे, उपाध्यक्ष किशोर रामटेके, सचिव महेश गौर, सुरेंद्र वाढई, सहसचिव टीना मेठी, पालक प्रतिनिधी हिना बिसेन, सोमनाथ खडे, उमेश भंडारकर, सचिन कांबळे, नीरज गुप्ता, बनिता वाहणे, संजय चुटे, कल्पना हाडगे, प्रेम तिर्यानी, शिक्षक प्रतिनिधी भारती रहांगडाले, सोनाली खंडेलवाल, निशा तुरकर व सुमन खंडेलवाल उपस्थित होते. बैठकीत शैक्षणिक उत्कृष्टतेला चालना देणे, सहशालेय उपक्रम बळकट करणे, विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी कार्य करणे तसेच पोषक शैक्षणिक वातावरणासाठी सामूहिक प्रयत्नांवर भर देण्यात आला. सर्व सदस्यांनी मौल्यवान सूचना दिल्या

# जि.प. व. प्राथमिक शाळेत डिजीटल संगणक कक्षाचे उद्घाटन




**प्रतिनिधी / सालेकसा**

आमदार अभिजीत वंजारी यांच्या स्थानिक निधीतून जिल्हा परिषद वरिष्ठ केंद्रीय प्राथमिक शाळा तिरखेडी शाळेला संगणक व डिजीटल प्रिंटर प्राप्त झाले. दरम्यान जिल्हा परिषद सदस्य विमल कटरे, सरपंच प्रिया शरणागत, गटशिक्षणाधिकारी विशाल डोंगरे यांच्या उपस्थितीत डिजीटल संगणक कक्षचे उद्घाटन करण्यात आले.

शाळेच्या विकासाबद्दल असलेली तळमळ व ग्रामीण भागातील शाळा ह्या टिकल्या पाहिजे व इथुनच नवीन नवीन अधिकारी घडले पाहिजे असा व्यापक दृष्टिकोनातून जि.प. सदस्य विमल कटरे, सरपंच प्रिया शरणागत, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विजय कटरे, सामाजिक कार्यकर्ता मनोज शरणागत यांनी अथक प्रयत्न करून जि.प. केंद्रीय वरिष्ठ प्राथमिक शाळेला डिजीटल संगणक कक्षा मिळावे, यासाठी अविरत कार्य केले. दरम्यान विशाल डोंगरे यांनी विद्यार्थ्यांशी गुणवत्ता विषयक चर्चा केली. दरम्यान शाळेतून अधिकारी कसे निर्माण होतिल तसेच शाळा ही समाज घडविण्याचे क्रांतिकारी शस्त्र आहे, शाळेला उच्च पातळीवर नेण्यासाठी विद्यार्थी डिजिटल होने आजची गरज आहे, असे मत जि.प.सदस्य विमल कटरे यांनी व्यक्त केले, सरपंच प्रिया शरणागत यांनी सुद्धा डिजिटल युगात शाळेला उच्च गुणवत्ता निर्माण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमतेचा वापर होने ही आजची गरज असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी मुख्याध्यापक एस. जी. जाधव, विजय कटरे, मनोज शरणागत, राजेश खोब्रागडे, चेतन, निशांत, मोरे मॅडम, तुरकर आदी उपस्थित होते.

# अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा : गंगाधर परशुरामकर

**सडक अर्जुनी :** जिल्ह्यात सर्वत्र मागील दोन दिवसापासून अवकाळी पाऊस वादळी वारा व गारपिटीने शेतकऱ्यांचे धान पीक भाजीपाला पिकाचे नुकसान झालेले आहे. त्यातच तारीख २८ रोजी सडक अर्जुनी तालुक्यात वादळी वाऱ्यासह गारांच्या पाऊस मोठ्या प्रमाणात झाला असून कोकणा परिसरात धान पीक व भाजीपाला पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच आज तारीख २९ रोजी पुन्हा अवकाळी पाऊस व वादळ वाऱ्यामुळे कापणीला आलेल्या धान पिकाचे सुद्धा बऱ्याच प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकरी बांधवांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाधर परशुरामकर यांनी केली आहे.



तालुक्यात यंदाच्या रब्बी हंगामात बऱ्याच हेक्टर क्षेत्राखाली धान पिकाची लागवड, तसेच भाजीपाला पिकाची सुद्धा लागवड करण्यात आली आहे. मात्र अवकाळी पावसाने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीत आणले आहे. तालुक्यातील बऱ्याच शेतकऱ्यांचे धान पिकाचे नुकसान, तसेच भाजीपाला पिकाचे सुद्धा नुकसान झाले असून गारपीटने सुद्धा अनेक घरांचे कवेलू फुटले असून यामध्ये सुद्धा अनेक नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने झालेल्या नुकसानीची तात्काळ सखोल चौकशी करावी व नुकसानग्रस्तांना भरपाई देण्यात यावी अशी मागणी माजी जि. प. सदस्य गंगाधर परशुरामकर यांनी केली आहे.

# घोषणा झाल्यानंतरही गाड्यांची फलाट बदली



**गोंदिया :** एक्स्प्रेस, सुपरफास्ट, लोकल पॅसेंजरसह सगळ्याच रेल्वेगाड्यांचे वेळापत्रक मोलकमडले असतानाच आता रेल्वेची यंत्रणा संतुलन बिघडल्यासारखी झाली आहे. यंत्रणेला कोणती गाडी कोणत्या फलाटावर लागेल, हेच कळेनासे झाले आहे. फलाट क्रमांक एकवरची रेल्वेगाडी दुसऱ्या फलाटावर लागत असल्याची दवंडी देतात. त्यामुळे प्रवासी दुसऱ्या फलाटावर जातात. मात्र, ती गाडी दुसऱ्या फलाटावर न लागता पहिल्याच फलाटावर लागते. यात या फलाटावरून त्या फलाटावर जाताना प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

दक्षिण पूर्व मध्ये रेल्वेचे गोंदिया रेल्वेस्थानक हे मध्यवर्ती ठिकाण आहे. या रेल्वेस्थानकावर लोकल, पॅसेंजर गाड्यांसह सुपरफास्ट, एक्स्प्रेस रेल्वेगाड्यांचादेखील थांबा आहे. त्यामुळे दररोज हजारो प्रवासी रेल्वेने ये-जा करतात. परंतु, कोळसा वाहून नेणाऱ्या मालगाड्यांनी प्रवासी रेल्वेगाड्यांची पुरती वाट लावली आहे. वेळापत्रकाची ऐशीतैशी झाली आहे. नागपूरच नव्हे तर रायपूरकडून गोंदियाच्या दिशेने तसेच बालाघाट, बल्लारशाच्या दिशेने येणाऱ्या जाणाऱ्या सर्वच गाड्या तासन् तास उशिरा धावत आहेत. मालगाड्यांना प्रथम प्राधान्य दिले जात आहे.

त्यामुळे निर्धारित वेळी निश्चितस्थळी पोहोचता येत नसल्यामुळे प्रवासी त्रस्त आहे. अशातच आता रेल्वेच्या यंत्रणेचे डोके गरगरले की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. गाडी येत असल्याची दवंडी दिल्यानंतरही कधी-कधी चार ते पाच मालगाड्या समोर काढल्याशिवाय प्रवासी गाडी स्थानकावर येत नाही. फलाट क्रमांक एकवरची गाडी दुसऱ्या फलाटावर लागत असल्याची दवंडी देण्यात आली. त्यामुळे प्रवासी दुसऱ्या फलाटावर गेले. मात्र, ती गाडी दुसऱ्या फलाटावर न लागता पहिल्याच फलाटावर लागली.

# सुगरण पक्षी होतोय दुर्मीळ !

**गोंदिया :** 'घरट्याची वीण घट्ट; पण जगणं अवघड...' ही ओळ आज सुगरण पक्ष्याच्या वास्तव स्थितीचे अत्यंत प्रत्ययकारी चित्र उभे करते. कला व सुबकतेचे प्रतीक असलेला सुगरण पक्षी हळूहळू कालबाह्य होत चालला आहे. पूर्वी गावागावांमध्ये, जंगलाच्या कडांवर किंवा ओढ्याच्या काठावर काटेरी झाडांवर लटकणारी त्याची सुबक घरटी आता दुर्मीळ होत चालली आहेत. गत काही वर्षांपासून निसर्गाचा समतोल ढासळत आहे. वनसंपत्तीचा ऱ्हास, भूजल पातळीतील घट आणि हवामानातील बदल यामुळे अनेक



पक्ष्यांच्या प्रजातींना अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागत आहे. त्यात सुगरण पक्ष्याचेही नाव समाविष्ट झाले आहे. सुगरण पक्षी बहुधा मे ते सप्टेंबर या कालावधीत घरटी बांधतो. गवत, लाकडी तुकडे, पालापाचोळा अशा सामग्रीचा वापर करून तो आपल्या चोचीने कलात्मक आणि मजबूत घरटे उभारतो.

# उसाचा रस, लिंबूपाणी... कोकम सरबतला पसंती

**गोंदिया :** दिवसभर उन्हाची काहिली व उकाड्यामुळे उन्हाचे चटके मोठ्या प्रमाणात जाणवत आहेत. ऊन, प्रचंड उकाडा, घशाला सतत पडणारी कोरड यामुळे शहरात जागोजागी थंड पेयांची मागणी वाढली आहे. यामुळे नागरिक आता शीत पेयांच्या स्टॉलकडे वळू लागले आहेत. परिणामी, स्टॉलधारकांनी शीतपेय विक्रीवर विशेष भर दिल्याचे शहरात दिसून येत आहे.

जागोजागी उसाच्या रसवंतीच्या गाड्या मोठ्या प्रमाणात नजरेस पडत



आहेत. उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे नागरिक हैराण होत आहेत. पारा ४२ डिग्री सेल्सिअसवर पोहचला आहे. त्यामुळे विविध ठिकाणी थंड पेयांची दुकाने थाटली असल्याचे चित्र दिसून येत आहे. उन्हापासून दिलासा मिळण्यासाठी नागरिकांची उसाचा रस, लिंबू पाणी व कोकम सरबतला अधिक पसंती आहे.

# वाढलेले विजेचे दर ग्रामविकासाला मारक

**मुंडीकोटा :** मानवाच्या विकासाच्या जडणघडणीत औद्योगिक ग्रामीण क्षेत्राचा मोठा वाटा आहे. औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी हा मोठा घटक असला तरी त्याच्या भूर्दंड ग्रामीण व्यवसायिक वीज वापरणाऱ्या ग्राहकांना भरावा लागतो. विजेच्या सवलतींमुळे ग्रामीण भागातील ग्राहकांना त्याचा सर्वाधिक फटका बसला असून त्यांचे आर्थिक बजेट कोलमडले आहे.

वीज नियामक मंडळ सरकारच्या मर्जीने सवलत देते. परंतु त्यांची मागणी नसतानाही सत्ता काबीज करण्यासाठी सरकार अशा सवलती वाटते. त्याचा भूर्दंड सर्वसाधारण आणि प्रामाणिक ग्रामीण व्यावसायिक ग्राहकांनाच सोसावा लागत आहे. सत्तेवर आल्यानंतर अंमलबजावणी करण्यासाठी सत्ताधाऱ्यांसाठी तारेवरची कसरत करावी लागते. व्यावसायिक किंवा ग्रामीण भागातील छोट्या ग्राहकांना त्यांचे वीजदर वाढविल्यामुळे सर्वात मोठा फटका बसत आहे. सवलतींची पूर्तता करण्यासाठी ग्रामीण व्यवसायिक ग्राहकांना बळीचा बकरा बनविला जातो. त्यामुळे अनेक ग्रामीण भागातील व्यवसाय दुकानदारांचे वीज बिल थकल्यामुळे व्यवसाय मोडकळीस आले. आजघडीला व्यवसायिक ग्राहकांना एका युनिटमागे १४ ते १७ रुपये खर्च करावे लागतात. त्यामुळे अशा परिस्थितीत व्यवसाय टिकविणे कसरतीचे आहे. त्यामुळे अनेकांचे व्यवसाय मोडकळीस आले आहेत काही व्यवसायिक वीजग्राहक कर्मचाऱ्यांच्या संगनमताने वीज बिल कमी करण्याच्या नवा फंडा अंमलात आणतात. असे असले तरी प्रमाणिक व सतत भरणा करणाऱ्यांना त्याच्या भूर्दंड सोसावा लागतो.

काही वर्षांपूर्वी शहरी भागात वापरण्यात येणारी व्यावसायिक वीज बिलाचे दर जास्त तर ग्रामीण भागातील वीज व्यवसायाचे दर कमी होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात लहान-मोठे कुटीर उद्योग, लघुउद्योग आणि छोटे दुकानदारही आपले उद्योग सुरू करीत होते. परंतु आता शहरी व ग्रामीण भागातील वीज व्यावसायिक ग्राहकांना सारखाच दर लावल्यामुळे ग्रामीण भागातील व्यवसाय मोडकळीस आला आहे.

# नमाद महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**प्रतिनिधी / गोंदिया**

येथील नटवरलाल माणिकलाल दलाल महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच स्पर्धा परीक्षांमध्ये सुयश प्राप्त करून शासकीय सेवेत रुजू होणाऱ्या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. रवींद्र मोहतुरे यांच्या अध्यक्षतेत आयोजित कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. रवी रहांगडाले, डॉ. संजय जगणे, डॉ. योगराज बैस, डॉ. अंबादास बाकरे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. मोहतुरे यांनी, स्पर्धा ही केवळ शिक्षणातच नसते, तर ती आपल्या जगण्याशी असते. सोबतच आपल्या कर्तृत्वाची असते.



स्पर्धेत यशस्वी व्हायचे असेल तर आपण वाचनावर भर देणे आवश्यक आहे, असे सांगीतले. दरम्यान, सुरू शैक्षणिक सत्रात शिक्षण घेत असलेली विद्यार्थिनी सरिता खोटेले हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महसूल सहायकपदी, उज्ज्वला शहारे हिची आयुध निर्माण कारखाना चंद्रपूर येथे तंत्रज्ञपदी, तर रुपेश बावने याची महाराष्ट्र वन विभागात वनरक्षक पदावर निवड झाली. याबद्दल त्यांचा महाविद्यालयाकडून सत्कार करण्यात आला. संचालन विद्यार्थी गीतांश असाटी व खुदशिया शेख यांनी केले. आभार यश जैन यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. सरिता उदापूरकर, डॉ. तृप्ती पटेल, डॉ. खुशबू होतचंदानी, डॉ. अश्विनी दलाल, डॉ. भावेश जसानी आदी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# विद्यार्थ्यांनो आम्ही सदैव तुमच्या पाठीशी : अजय उके



**सालेकसा :** विद्यार्थी मित्रांनो समोर तुम्ही कोणत्याही शाळेत गेलेत तरीही आम्ही तुमच्या सदैव पाठीशी राहणार असे प्रतिपादन शाळेचे मुख्याध्यापक अजय उके यांनी केले. ते जिल्हा परिषद शाळा कडोतीटोला येथे वर्ग सातवीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप व सत्कार कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शैलेश शहारे, पाहुणे म्हणून सरपंच आम्रपाली कोटांगले, कुशोबा बडोले, संजय कोरे, किशोर वालदे, राहुल शहारे संजय नंदेश्वर, नंदा मेश्राम, पवन शहरे, विजेंद्र मेंढे, विजेंद्र कोटांगले, विशाल पानढवळे, अनिल पडळकर केवल नंदेश्वर उपस्थित होते. सातवीच्या विद्यार्थ्यांनी शाळेबद्दल आपले अनुभव सांगितले. तसेच मान्यवरांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व शाळेतर्फे सातवीच्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू देण्यात आले. व सगळ्यांना भोजन देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# जिल्हा परिषद मेंढा शाळेची यशाची परंपरा कायम

**तिरोडा :** सत्र २०२४-२५ साठी घेण्यात आलेल्या प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे निकाल नुकताच जाहीर करण्यात आले. यामध्ये तालुक्यातील मेंढे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या दोन विद्यार्थिनींनी बाजी मारली. कु. हिमांशी कैलास मेश्राम, कु. कोमल अनिल भैरम हे दोघी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. त्यांच्या यशाबद्दल मुख्याध्यापक नरेंद्र आगाशे, सी. बी. अंबुले, केंद्र प्रमुख सुकडी यु.पी. बिसेन, पदवीधर शिक्षक राजेश पटले, अरविंद सिंदीमेश्राम, आर. डी. पटले, अशित घरडे, संदीप मेश्राम, सरपंच संगीता सूर्यवंशी, प्रतिक्षा उके, शिक्षक वृंद यासह गावकऱ्यांनी कौतुल केले.

# आता पेपर तपासणीचे शिक्षकांसमोर आव्हान!

**प्रतिनिधी / गोंदिया**

राज्यभरातील शाळांतील पहिली ते नववीच्या लांबलेल्या वार्षिक परीक्षा अखेर शुक्रवारी (दि. २५) संपल्या. पेपर तपासणीसाठी शिक्षकांना केवळ पाच दिवसच मिळणार असल्याने या अपल्शा कालावधीत सर्व विषयांच्या उत्तरपत्रिका तपासून त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचे गुणपत्रक बनवून निकालपत्र बनवण्याचे मोठे आव्हान शिक्षकांसमोर ठाकले आहे. १ मे महाराष्ट्र दिनाला निकाल जाहीर केला जाणार असल्याने निकाल तयार करताना शिक्षकांची पुरती दमछाक होणार आहे.

दरवर्षी एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात विद्यार्थ्यांची अंतिम लेखी परीक्षा घेतली जात असे. यंदा मात्र महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात परीक्षा घेण्याची पद्धत बंद करीत राज्यातील परीक्षा एकाच वेळी घेण्याच्या सूचना दिल्या. एससीईआरटीने केलेल्या या बदलानुसार, राज्यभरातील पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा आणि संकलित चाचणी (पॅट) ८ ते २५ एप्रिल या कालावधीत घेण्याची शाळांना सक्ती केली होती. तसेच या परीक्षांचा निकाल १ मेपर्यंत लावण्याबाबतही एससीईआरटीने सूचना जाहीर केल्या. या सूचना आल्यानंतर शिक्षक संघटनांनी विरोध करण्याचा प्रयत्नही केला. पण शालेय शिक्षण विभागाने आपला हा निर्णय पुढे रेटत नव्या वेळापत्रकानुसारच परीक्षा घेतल्या.

वाढत्या तापमानात परीक्षांचे नियोजन केल्याने राज्यातील पालक चिंतेत होते. ही चिंता मिटली असून शनिवारपासून



विद्यार्थ्यांना सुट्ट्या लागल्या आहेत. मात्र शिक्षकांना आणखी काही दिवस शाळेत यावे लागणार आहे. १ मे ला शाळांकडून विद्यार्थ्यांचा वार्षिक निकाल जाहीर केला जाणार आहे. त्यामुळे शिक्षकांना या दिलेल्या कालावधीत विद्यार्थ्यांचे पेपर तपासावे लागणार आहेत आणि त्यांचे गुणपत्रक तयार करावे लागणार आहे. छोट्या शाळांना निकाल जाहीर करण्यात फार अडचण येणार नाही. पण मोठ्या आणि अधिक पटसंख्या असलेल्या शिक्षकांची अग्निपरीक्षा ठरणार आहे. वार्षिक परीक्षांचा निकाल तयार झाल्यानंतर हा निकाल मुख्याध्यापकांकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येतो. मंजुरी मिळाल्यानंतर निकाल जाहीर केला जातो. ही प्रक्रिया अत्यंत बारकाईने करावी लागते. मात्र, अवघ्या पाच दिवसांच्या कालावधीत ही सर्व प्रक्रिया पार पाडताना शिक्षकांची मोठी दमछाक होणार आहे.

## नव्या वर्षातही अनेक बदल...

जून २०२५ पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून शाळांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २020 ची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या नवीन धोरणामुळे राज्याच्या शिक्षण व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडून येणार आहेत. जून २०२५ पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षात पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासक्रम लागू होणार आहे. याचीही तयारी शिक्षकांना आतापासून तयारी करावी लागणार आहे. पहिलीच्या नवीन शैक्षणिक पद्धतीत एनसीईआरटीच्या धर्तीवर समतोल, मूल्यमापन-आधारित आणि कौशल्याधारित शिक्षणावर भर दिला जाणार आहे. शाळेच्या वेळापत्रकात, विषय नियोजनात, मूल्यांकन पद्धतीत आणि परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात येणार आहेत.

: आरएनआय रजिस्ट्रेशन क्रमांक : No-MAHMAR 2011/40516
महासागर गोंदिया
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर-१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय : शुभमंगल कार्यालय, एलआयसी ऑफीसजवळ, गणेशनगर, गोंदिया येथून प्रकाशित केले. संपादक-श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन-०७१२-२७६७२८, ९३७३११७०४२ स्थानिक संपादक : जयंत मदनलाल शुक्ला, फोन ९८२२३८६९९९ (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील)

# बालांगण

## असं आहे 'सॅन मरिनो'



सफर देशांची

'सॅन मरिनो' हा दक्षिण युरोपमधला एक देश आहे. सॅन मरिनो जगातला पाचव्या तर युरोपातला तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात लहान आकाराचा देश आहे. हा देश चारही बाजूंनी इटलीने वेढलेला आहे. या देशाची लोकसंख्या फक्त तीस हजार आहे. 'सिटी ऑफ सॅन मरिनो'ही या देशाची राजधानी. 'सॅन मरिनो' ही जगातली सर्वात जुनी लोकशाही असल्याचं म्हटलं जातं. हा स्वतंत्र देश असला तरी तो मोठ्या प्रमाणावर इटलीवर अवलंबून आहे.

पर्यटन हा इथला सर्वात मोठा उद्योग आहे. गंमत म्हणजे पोस्टाचे जुने स्टॅंप विकण्याचा व्यवसायही इथले बरेच लोक करतात. हा इथल्या लोकांच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत आहे. युरो हेच सॅन मरिनोचं चलन आहे. या देशातले लोक इटालियन भाषा बोलतात. छोट्या आकाराचा हा देश निसर्गसौंदर्याने नटलेला आहे. ॲपेनाइन पर्वतरांगा हे या देशाचं ठळक वैशिष्ट्य. सॅन मरिनोचा बराचसा भाग डोंगराळ आहे. सपाट भूभाग इथे जवळपास नाहीच. 'मॉंटे टिटॅनो' हे इथलं सर्वात उंच शिखर आहे.

सॅन मरिनोमध्ये विविध प्रजातींचे प्राणी आणि पक्षी पहायला मिळतात. इथे शेतीही केली जाते. गहू, द्राक्ष, मका, ऑलिव्ह ही पिकं इथे घेतली जातात. काही लोक पशुपालनाचा व्यवसायही करतात. १९९२ मध्ये हा देश संयुक्त राष्ट्रांचा सदस्य बनला. इथे कुटुंबव्यवस्था अस्तित्वात आहे. इथे सुंदर शिल्पं पहायला मिळतात. या देशात २२० किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. देशाच्या संरक्षणाची जबाबदारी इटलीवर आहे.

## एसीची गोष्ट



गंमत जंमत

छोट्या दोस्तांनो, चला... आपण एसी वापरताना काय काय लक्षात ठेवायचं ते बघू या.

ताई: ए गौरव, ऐक... तुला माहीत आहे का, आपण घरात एसी सुरू करतो तेव्हा काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात.

गौरव: का गं, काय होतं एसी सुरू केल्यावर?

ताई: अरे, एसी सुरू केला की खूप थंड हवा येते, बरोबर? पण ती थंड हवा अंगावर थेट आली तर सर्दी, खोकला किंवा अगदी तापही येऊ शकतो.

गौरव: मग हा त्रास टाळण्यासाठी काय करायचं?

ताई: बघ, काही सोप्या गोष्टी लक्षात ठेवायच्या. जसे की, थंड हवा थेट अंगावर येऊ द्यायची नाही. एसीमध्ये झोपताना पांघरूण घ्यायचं. झोपताना शरीर थोडं उबदार राहायला हवं. महत्त्वाचं म्हणजे एसीच्या गारव्याने खोलीतील वातावरण खूप थंड होऊ द्यायचे नाही. २४ ते २६ डिग्री तापमान ठेवलं की एकदम मस्त वाटतं.

गौरव: ताई, आणखी काय करायचं?

ताई: एसी सुरू ठेवून खूप काळ झोपायचं वा खोलीत बसायचं नाही. त्यासाठी टाइमर लावून ठेवता येतो. त्याने एसी ठराविक वेळेनंतर आपोआप बंद होतो. महत्त्वाचं म्हणजे खोलीमध्ये थोडी का होईना, पण फ्रेश हवा येत राहिली पाहिजे. म्हणून थोड्या थोड्या वेळाने खिडकी उघडली पाहिजे. खोलीत पाण्याचे भांडे भरुन ठेवायचे. यामुळे हवा कोरडी होत नाही. या उपायामुळे आपला नाक, घसा कोरडा पडत नाही.

गौरव: ओह! म्हणजे एसी मस्त आहे, पण त्याचा वापर नीट केला पाहिजे.

ताई: अगदी बरोबर! एसी म्हणजे थंडीची जादू आहे. पण ही जादू वापरताना थोडा शहाणपणा वापरावा लागतो इतकंच.

गौरव: ताई, यापुढे मी हे लक्षात ठेवेन. एसी सुरू असेल तेव्हा थेट हवेचा झोत अंगावर घेत झोपणार नाही. हलकेसे पांघरुण घेईन. उन्हात खेळून आल्याबरोबर लगेचच थंड खोलीत जाणार नाही.

## फळे खा, तंदुरुस्त राहा

स्टे फिट

मुलांनो, प्रत्येक हंगामात वेगवेगळी फळं मिळतात. फळांमध्ये भरपूर पोषणमूल्यं असतात. त्यामुळे बाहेरचं, जंकफूड खाण्यापेक्षा एखादं फळ जवळ ठेवणं कधीही चांगलं. प्रत्येक फळातले पोषक घटक वेगळे, त्यांचे उपयोगही वेगळे... तर अशाच काही फळांमधल्या पोषक घटकांची माहिती करून घेऊ.



* उन्हाळ्यात बाजारात जांभळं येतात. आंबटगोड जांभळं खायला खूप छान लागतात. जांभळामध्ये बरेच पोषक घटक असतात. या फळात लोह, पोटॅशियम आणि काही जीवनसत्त्वं असतात. जांभळात कॅलरीही खूप कमी असतात.

* पिअर हे फळ अनेक विकारांवर लाभदायी ठरतं. यातल्या जीवनसत्त्वांमुळे विविध जंतूंपासून शरीराचं रक्षण होतं. म्हणूनच याचं सेवन करायला हवं.

* लिची हे फळ तुम्हाला आवडत असेल. या फळाची साल लाल आणि गर पांढऱ्या रंगाचा असतो. लिचीमध्ये 'क' जीवनसत्त्व असतं.

* चेरी हे छोटंसं फळ असलं तरी ते खूप म्हणजे खूप गुणकारी आहे. यात कर्बोदकं, जीवनसत्त्वं, बीटा कॅरोटिन, कॅल्शियम असे बरेच घटक असतात.

* प्लम किंवा आलूबुखारा हे लाल रंगाचं फळ आहे. या फळातल्या विविध घटकांमुळे रक्त शुद्ध होतं. प्लम खाल्ल्याने रक्ताभिसरण सुधारतं.

## सामाजिक क्षेत्रात काम करा

कोण होणार?

मुलांनो, तुम्हाला समाजकार्यात रस असेल तर तुम्ही सामाजिक क्षेत्रात करिअर करू शकता. समाजकार्य म्हणजे फक्त एखाद्या सामाजिक संस्थेत काम करणं नाही, तर त्यापेक्षाही बरंच काही आहे. सामाजिक क्षेत्राशी संबंधित बरेच अभ्यासक्रमही आहेत. अशाच काही अभ्यासक्रमांची ओळख करून घेऊ.





* 'ह्युमन रिसोर्स अँड लेबर रिलेशन्स' या अभ्यासक्रमाला सध्या बरीच मागणी आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर आयटी, बँकिंग अँड फायनान्स, मॅनेजमेंट कन्सल्टंसी, मॅन्युफॅक्चरिंग, टेलिकॉम, पब्लिक सेक्टर या क्षेत्रांमध्ये तुम्ही काम करू शकता.

* 'डेव्हलपमेंट स्टडीज' हा अभ्याक्रम पूर्ण करून तुम्ही बरंच काही करू शकता. संयुक्त राष्ट्रांच्या आकडेवारीनुसार २०३० पर्यंत जगातील ८५ टक्के लोकसंख्या विकसनशील राष्ट्रांमध्ये रहाणारी असेल. त्यामुळे विकासकामं वेगाने होतील. पर्यावरण रक्षणाचा प्रश्नही आ वासून उभा राहील. अशा वेळी विकासाचे कार्यक्रम राबवणाऱ्या तज्ज्ञांच्या मागणीत बरीच वाढ होईल.

* 'सोशल आंत्रप्रेन्योर' या संकल्पनेत आपल्या उद्योग-व्यवसायाच्या माध्यमातून सामजिक कार्य करता येतं. त्यामुळे या विषयाचं ज्ञान तुम्हाला खूप पुढे घेऊन जाईल.

* हवामान बदल हा सध्याचा खूप मोठा प्रश्न आहे. म्हणूनच 'क्लायमेट चेंज अँड सस्टेनेबिलिटी स्टडीज'ला मोठी मागणी आहे. शाश्वत विकास ही काळाची गरज आहे. पर्यावरण रक्षणाच्या नव्या कल्पना तुमच्याकडे असतील तर हा विषया निवडता येईल.

ठिपके जुळवा



## आकाश निळे, कशामुळे ?

विचार करा

छोट्या दोस्तांनो, आकाश हा शब्द कानी पडताच आपल्या डोळ्यासमोर एक निळाई पसरते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की, आकाश निळेच का आहे? अवकाशातून पृथ्वीवरील सर्व काही काळे दिसत असले तरी पृथ्वीवरून आकाश मात्र निळे का दिसते?

या प्रश्नाचे उत्तर खूप मनोरंजक आहे. तुम्हाला माहितीच आहे की, सूर्यप्रकाश पांढरा असतो. पण प्रत्यक्षात तो सात रंगांनी बनलेला असतो.



हे सात रंग म्हणजे जांभळा, निळा, हिरवा, पांढरा, पिवळा, नारिंगी आणि लाल...

यालाच आपण स्पेक्ट्रम म्हणतो. हा प्रकाश पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करतो तेव्हा हवेच्या रेणू आणि धुळीच्या कणांशी धडकतो आणि त्यातून प्रकाश पसरतो.

आकाशाचा रंग निळा असल्याचे मुख्य कारण 'रेलेज स्कॅटरिंग लॉ' मध्ये दडले आहे. या नियमानुसार, वेगवेगळ्या रंगांच्या प्रकाशाचे विकिरण त्यांच्या तरंगलांबीवर अवलंबून असते. म्हणजेच कमी तरंगलांबी असणारे रंग (निळे आणि जांभळे) जास्त पसरतात तर जास्त तरंगलांबी असणारे रंग (लाल आणि पिवळे) कमी पसरतात.

निळ्या रंगाची तरंगलांबी (सुमारे ४५०-४९५ नॅनोमीटर) म्हणजे खूपच कमी असल्याने ती वातावरणात असणाऱ्या नायट्रोजन आणि ऑक्सिजन रेणूंना धडकते आणि सर्व दिशांना विखुरते. म्हणूनच आपल्याला आकाश निळे दिसते.

मग एक प्रश्न उद्‌भवतो की, जांभळ्या रंगाची तरंगलांबी निळ्यापेक्षा कमी असली तरी मग आकाश जांभळे का दिसत नाही? मुलांनो, याचे कारण असे की, मानवी डोळे निळ्या रंगाबद्दल अधिक संवेदनशील असतात. डोळ्यांना जांभळा रंग कमी दिसतो. म्हणूनच जांभळ्या रंगाचे अधिक विखुरणे असूनही आपल्याला आकाश निळेच दिसते.

सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी सूर्यकिरणांना वातावरणात जास्त अंतर पार करावे लागते. या दरम्यान निळा आणि कमी तरंगलांबी असणारा प्रकाश आधीच विखुरला जातो आणि फक्त लांब तरंगलांबी रंग (लाल, नारिंगी) आपल्या डोळ्यांपर्यंत पोहोचू शकतात. म्हणूनच सूर्य उगवतो आणि मावळतो तेव्हा आकाश लाल-केशरी दिसते.




## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत सुवर्णपदक पटकावणारी पहिली भारतीय बॅडमिंटनपटू कोण?
२) टेलेस्कोपचा शोध कोणी लावला?
३) जगातलं सर्वात मोठं प्राणीसंग्रहालय कोणतं?
४) जगातला सर्वात लहान आकाराचा पक्षी कोणता?
५) जगातला सर्वात मोठा समुद्र कोणता?
६) पर्ल हार्बर हे बेट कोणत्या महासागरात आहे?
७) चीनची राजधानी कोणती?
८) फिनलॅंडची राजधानी कोणती?
९) हवाना ही कोणत्या देशाची राजधानी आहे?
१०) पंचतंत्राचे मूळ लेखक कोण?

उत्तर : १) पी.व्ही. सिंधू २) गॅलिलिओ गॅलिली ३) बर्लिन झूलॉजिकल गार्डन ४) हमिंग बर्ड ५) फिलिपाईन समुद्र ६) पॅसिफिक महासागर ७) बीजिंग ८) हेलसिंकी ९) क्युबा १०) विष्णू शर्मा

## कबड्डीविषयी...

खेळा आणि शिका

मित्रांनो, तुम्हाला कबड्डी हा खेळ आवडत असेल. यात खेळाडू शत्रूच्या क्षेत्रात प्रवेश करण्याचा, त्यांना स्पर्श करण्याचा आणि परत येण्याचा प्रयत्न करतो आणि एकाच श्वासात कबड्डी, कबड्डी म्हणतो. म्हणूनच यात चपळता, ताकद, रणनीती, टीमवर्क आणि श्वास रोखून ठेवण्याची क्षमता यांचे मिश्रण दिसून येते.

तर मित्रांनो, कबड्डीची सुरुवात आपल्याच देशाच्या मातीपासून झाली. पूर्वी भारतातील खेड्यांमध्ये मुले आणि तरुण हा खेळ खेळत असत आणि तेही बूट, मैदान किंवा तांत्रिक नियमांशिवाय. आजही हा खेळ तमिळनाडू, महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश सारख्या राज्यांमध्ये विशेष लोकप्रिय आहे.

हा खेळ आपल्या सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक आहे. खेळाडू वारंवार कबड्डी-कबड्डी का म्हणतो, हा प्रश्न अनेकांना पडतो. कबड्डी हा शब्द 'काई-पिडी' पासून आला असून तमिळमध्ये त्याचा अर्थ 'हात धरणे' असा होतो. पण शब्द एकाच श्वासात म्हणत असताना 'कबड्डी' म्हटले जाते. श्वास तुटला तर खेळाडू बाहेर पडतो.



कबड्डीची पाळेमुळे अगदी महाभारतासारख्या प्राचीन कथांमध्येही आढळतात. अभिमन्यूच्या चक्रव्यूहात प्रवेशाची कहाणी काहीशी कबड्डीच्या छाप्यासारखी वाटते. एक योद्धा शत्रूच्या वर्तुळात प्रवेश करतो पण रणनीतीअभावी तो पळून जाऊ शकत नाही. म्हणजेच या खेळात केवळ ताकदच नाही तर मन आणि हुशारीची देखील महत्त्वाची भूमिका असते. प्राचीन काळातील मानव कबड्डीचे तंत्र धोकादायक परिस्थितीत स्वतःचा बचाव करण्यासाठी किंवा हल्ला करण्यासाठी वापरत असलेल्या पद्धतींसारखेच आहे.

आता कबड्डी फक्त भारतापुरती मर्यादित राहिलेली नाही. या खेळाने इराण, दक्षिण कोरिया, जपान, केनिया आणि अगदी अमेरिकेतही आपले स्थान निर्माण केले आहे. भारत आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सातत्याने चांगली कामगिरी करत असून हा खेळ देशाचा अभिमान बनला आहे.

### दोस्त हे मस्त


#### देखणे फ्लेमिंगो



दोस्त हे मस्त ग्रेटर फ्लेमिंगो हा पक्षी भारतातल्या बऱ्याच ठिकाणी आढळतो. हे पक्षी विशिष्ट आवाज काढून एकमेकांना संदेश देतात. फ्लेमिंगोची उंची पाच फूटांपर्यंत असते. याचे पाय लांब आणि बारीक असतात. फ्लेमिंगोचं वैशिष्ट्य म्हणजे हा पक्षी चार ते पाच तास एका पायावर उभा राहू शकतो. याच स्थितीत तो झोपूही शकतो. छोटे मासे, किटक, शेवाळं हे या पक्ष्याचं अन्न आहे.

### स्टडी टिप्स

#### घेऊ नका ताण...



छोट्यांनो, कोणत्याही गोष्टीचा ताण घेऊन काहीच होणार नाही. कोणत्याही परीक्षेचा ताण घेत असाल तर यामुळे तुम्ही नीट पेपर लिहू शकणार नाही. म्हणूनच परीक्षेचा ताण येणार नाही यासाठी तुम्हालाच प्रयत्न करायला हवेत. ताण टाळण्यासाठी सुट्टीतही थोडाफार अभ्यास करा. पुस्तकं वाचण्याचा सराव ठेवा. आत्तापर्यंत अभ्यासलेल्या विषयांची उजळणी करा. यामुळे ज्ञानात भर पडेल आणि ताण कमी होईल.

### खादाडी

#### चीझी स्वीट कॉर्न

मुलांनो, कॉर्न म्हणजेच मक्यापासून विविध पदार्थ बनवता येतात. पिवळ्या रंगाचे स्वीट कॉन मस्त लागतात. यापासून



तुम्ही छानशी 'चीझी स्वीट कॉर्न' ही रेसिपी बनवू शकता. यासाठी अर्धा कप बारीक चिरलेला टोमॅटो, एक कप उकडलेले स्वीट कॉर्न, अर्धा कप किसलेलं चीझ, मीठ, अर्धा चमचा मिरपूड आणि चमचाभर ऑलिव्ह ऑईल असं साहित्य घ्या. एका मायक्रोवेव्ह सेफ भांड्यात कॉर्न घ्या. त्यात टोमॅटो, चीझ, ऑलिव्ह ऑईल, मीठ, मिरपूड घालून नीट हलवून घ्या. आत हे भांडं मायक्रोवेव्हमध्ये ठेवा. चीझ वितळेपर्यंत गरम करा. गरमागरम खा.

### योगा टाईम

#### उंची वाढवणारं मेरुदंडासन

मुलांनो, तुम्हाला उंच व्हायचं आहे का? मग योगासनं करायला सुरूवात करा. लहान वयात योगा केल्याने तुमची उंची वाढू शकते. त्यातच काही योगासनं उंची वाढायला मदतच करतात. असंच एक आसन म्हणजे मेरुदंडासन. हे आसन खूप सोपं आहे. यू ट्यूबवर व्हिडिओ बघून तुम्ही हे आसन करू शकता.

